


# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com




❑ वर्ष - १ ❑ अंक -२८० ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.१२ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी आजपासून पीएम मोदींचे विशेष अनुष्ठान, जनतेसाठी दिला खास संदेश

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

अयोध्येतील राम मंदारात प्राणप्रतिष्ठा सोहळा २२ जानेवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते होणार आहे. या सोहळ्याची जोरदार तयारी सुरू आहे. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यापूर्वी पीएम मोदींनी आजपासून म्हणजेच शुक्रवारपासून अनुष्ठान सुरू केले आहे. पीएम मोदींनी आज शुक्रवारी जनतेसाठी एक विशेष संदेश दिला आहे, या संदेशात सांगितले की, आजपासून मी ११ दिवसांचे अनुष्ठान सुरू करत आहे. आपल्या भावना शब्दात व्यक्त करणे खूप कठीण आहे. २२ जानेवारीला पीएम मोदी अयोध्येतील भव्य राम मंदिराचे उद्घाटन करणार आहेत. दरम्यान, आज पीएम मोदी महाराष्ट्र दौऱ्यावर आले आहेत, आधी नाशिक आणि नंतर मुंबईत विविध विकास कामांचे उद्घाटन करणार आहेत.

पीएम मोदींनी आपल्या संदेशात म्हटले आहे की, 'अयोध्येतील रामलल्लाच्या अभिषेकला फक्त ११ दिवस उरले आहेत. या शुभ सोहळ्याचा मी देखील साक्षीदार होणार हे माझे भाग्य आहे. परमेश्वराने मला जीवनाच्या अभिषेक दरम्यान भारतातील सर्व लोकांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी एक साधन बनवले आहे. हे लक्षात घेऊन मी आजपासून ११ दिवसांचे अनुष्ठान सुरू करत आहे. मी सर्व जनतेकडून आशीर्वाद मागत आहे. यावेळी माझ्या भावना शब्दात मांडणे खूप अवघड आहे, पण मी माझ्या बाजूने प्रयत्न केला आहे.

**आपल्या संदेशात पीएम मोदी काय म्हणाले?**

'सियावर राम चंद्र की जय म्हणत पंतप्रधान मोदींनी व्हिडीओ संदेशाची सुरुवात केली. ते म्हणाले, माझ्या देशबांधवांनो, राम-राम. जीवनातील काही क्षण दैवी आशीर्वादामुळेच वास्तवात



बदलतात. आजचा दिवस आपल्या सर्व भारतीयांसाठी आणि जगभरातील राम भक्तांसाठी एक पवित्र पर्व आहे. सर्वत्र भगवान श्री राम भक्तीचे अद्भुत वातावरण आहे. चारही दिशांना राम नामाचा सूर म्हणजे राम भजनातील अप्रतिम सुंदर स्वर. देशातील प्रत्येकजण २२ जानेवारीची वाट पाहत आहे. त्या ऐतिहासिक पवित्र क्षणाचा. अयोध्येतील रामललाच्या प्राणप्रतिष्ठासाठी आता फक्त ११ दिवस उरले आहेत. या शुभ सोहळ्याचे साक्षीदार होण्याची संधी मलाही मिळत आहे हे माझे भाग्य आहे. मी भावनिक आहे, असंही मोदी म्हणाले.

मी माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच अशा भावनांमधून जात आहे. भक्तीची एक वेगळी अनुभूती मी अनुभवत आहे. माझ्यासाठी ही अभिव्यक्तीची संधी नाही, तर अनुभवाची आहे. मला हवे असले तरी त्याची खोली, रुंदी आणि तीव्रता मी शब्दात मांडू शकत नाही. तुम्ही माझी परिस्थिती देखील समजू शकता, असंही मोदी या संदेशात म्हणाले.

**पीएम मोदी ११ दिवसांचे अनुष्ठान करणार**

पीएम मोदी म्हणाले, 'जे स्वप्न अनेक पिढ्यांच्या हृदयात वर्षानुवर्षे एका संकल्पाप्रमाणे जगले, ते पूर्ण होत असताना मला उपस्थित राहण्याचे सौभाग्य मिळाले. परमेश्वराने मला जीवनाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळा दरम्यान भारतातील सर्व लोकांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी एक साधन बनवले आहे. ही खूप मोठी जबाबदारी आहे. आपल्या धर्मग्रंथात सांगितल्याप्रमाणे भगवंताच्या यज्ञ आणि उपासनेसाठी आपल्याला स्वतःमध्येही परमात्मभाव जागृत करावा लागतो. म्हणून धर्मग्रंथात उपवास आणि कठोर नियम सांगितले आहेत, ज्यांचे पालन करण्यापूर्वी अभिषेक करावा लागतो. म्हणून मला काही तपस्वी आणि अध्यात्मिक प्रवासातील महापुरुषांकडून मिळालेले मार्गदर्शन आणि त्यांनी सांगितलेल्या नियमांनुसार मी आजपासून ११ दिवसांचे विशेष अनुष्ठान सुरू करत आहे. या पवित्र प्रसंगी मी देवाच्या चरणी प्रार्थना करतो आणि जनतेला प्रार्थना करतो की तुम्ही मला आशीर्वाद द्या जेणेकरून माझ्या बाजूने कोणतीही कमतरता भासू नये.

## सत्तेच्या अहंकारात असलेला सम्राट, वास्तवापासून दूर; राहुल गांधींचा हल्लाबोल

### काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भाजपावर जोरदार हल्लाबोल



**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

भारत जोडो न्याय यात्रा सुरू करण्यापूर्वी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भाजपावर जोरदार हल्लाबोल केला आहे. राहुल गांधी यांनी देशातील तरुणांना संबोधित केलं आहे. यावेळी त्यांनी देशाच्या तरुणांनो! आज राष्ट्रीय युवा दिनानिमित्त आपण स्वामी विवेकानंदांच्या विचारांचे पुन्हा स्मरण केलं पाहिजे. तरुणांची ऊर्जा हा समृद्ध देशाचा आधार आहे आणि पीडित आणि गरीबांची सेवा ही सर्वात मोठी तपश्चर्या असल्याचं म्हटलं आहे.

राहुल गांधी यांनी तरुणांना विचार करावा लागेल की आपल्या स्वप्नांच्या भारताची ओळख नेमकी काय असेल? जीवनाची गुणवत्ता की फक्त भावनिकता? प्रक्षोभक घोषणा देणारे तरुण की नोकरदार तरुण? प्रेम की द्वेष? आज खर्या मुद्द्यांवरून लक्ष हटवून भावनिक मुद्द्यांचा राजकीय दुरुपयोग केला जात आहे, हा देशातील जनतेचा विश्वासघात आहेवाढती बेरोजगारी आणि महागाईत तरुण आणि गरीब लोक शिक्षण, कमाई आणि औषधांच्या ओझ्याखाली दबले जात असून सरकार त्याला 'अमृत काळ' म्हणत आनंदोत्सव साजरा करत आहे. सत्तेच्या अहंकारात असलेला सम्राट वास्तवापासून दूर गेला आहे असं म्हटलं आहे.

**सत्याचा विजय होईल, न्याय होईल**

अन्यायाच्या या वादळात न्यायाची ज्योत तेवत ठेवण्यासाठी, स्वामी विवेकानंदजींच्या शिकवणीतून प्रेरणा घेऊन, न्याय हक्क मिळेपर्यंत करोडो तरुण न्याय योद्धे माझ्या या संघर्षात सामील होत आहेत. सत्याचा विजय होईल, न्याय होईल असं देखील म्हटलं आहे. राहुल गांधींची भारत जोडो न्याय यात्रा १४ जानेवारीपासून मणिपूरमधून सुरू होणार आहे.

## घराणेशाहीच्या राजकारणामुळे देशाचं नुकसान, नाशिकमध्ये मोदींचा हल्लाबोल; तरुणांना उद्देशून म्हणाले, राजकीय मतांपेक्षा...

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक नाशिक**

केंद्र आणि राज्य सरकारच्या युवक आणि क्रीडा विभागातर्फे येथे आयोजित २७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी नाशिक दौऱ्यावर आले आहेत. नाशिक दौऱ्यात त्यांनी काळाराम मंदिराचेही दर्शन घेतले. त्यानंतर जमलेल्या युवा समुदायाला त्यांनी संबोधित केलं. युवाशक्तीची जाणीव करून देत देशातील लोकशाही वाचवण्याकरता येत्या निवडणुकीत राजकीय मतं



मांडण्यापेक्षा मतदान करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, अमृतकाळच्या आजच्या तरुण पिढीवर माझा खूप विश्वास आहे. या कालखंडात देशातील अशी युवापिढी तयार होत आहे जी गुलामीच्या दबावात आणि प्रभावापासून मुक्त आहे. भारताची युवा पिढी आयुर्वेदाचे ब्रॅण्ड अम्बेसेडर आहे. तुम्ही तुमच्या आजी-आजोबांना विचारा. ते सांगतील, त्यांच्या काळात जेवणात बाजरीची भाकरी, कुटकी, रागी, ज्वार असायचे. पण गुलामीच्या मानसिकतेत या अन्नाला गरिबीसह जोडलं गेलं. यांना स्वयंपाकघरातून बाहेर काढलं गेलं. हेच अन्न आता मिलेट्सच्या रुपात, सुपर फूडच्या रुपात पुन्हा स्वयंपाकघरात पोहोचत आहे. सरकारने या मिलिट्सना श्री अन्नच्या रुपाने नवी ओळख दिली आहे. आता तुम्हाला श्री अन्नचा ब्रॅण्ड अम्बेसेडर बनायचं आहे. यामुळे तुमचं आरोग्यही सुधारेल आणि देशातील शेतकऱ्यांचंही भलं होणार आहे.

**सक्रीय राजकारणात तरुणांचा सहभाग वाढावा**

जमलेल्या तरुण समुदायाला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध उदाहरणे दिली. देशाची प्रगती साधण्याकरता तरुणांनी काय केलं पाहिजे, याचं मार्गदर्शनही केलं. तसंच, देशातील लोकशाही जिवंत ठेवण्याची जबाबदारीही तरुणांची असल्याचं ते म्हणाले. मोदी म्हणाले, राजकीय माध्यमातूनही देशाची सेवा करता येईल. मी जेव्हा ग्लोबल लीडर किंवा इनोव्हेटर्सना भेटतो तेव्हा मला त्यांच्यात एक अद्भूत आशा दिसते. आशा आणि आकांक्षाचे एक कारण आहे लोकशाही. भारत लोकशाहीची जननी आहे. लोकशाहीत तरुणांचा सहभाग जितका अधिक असेल तितके राष्ट्राचे भविष्य चांगले असेल.

## २० वी महाराष्ट्र राज्य बाल नाट्य स्पर्धा प्राथमिक फेरीला आज पासून अमरावती केंद्रावर सुरवात

### नाट्य कलेला अमरावती मधे पुन्हा सुगीचे दिवस

**दि.१२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

मागील २० वर्षांपासून महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतीक विभागाचे वतीने संपूर्ण राज्यभारत बालनाट्य स्पर्धेचे प्राथमिक फेरी आणि अंतीम फेरी अशा दोन टप्यात आयोजन होत असते. अमरावती केंद्रावर बालनाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला शनिवार दि. १३ जानेवारी पासून प्रारंभ होतं असून ही स्पर्धा सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे सकाळी १० वाजता पासून सुरु



होईल. मागील वर्षी अमरावती केंद्रावर सर्वाधिक बालनाट्य सादर झालीत आणि यावर्षी सुद्धा सर्वाधिक सादरीकरणाचा हा विक्रम कायम आहे. यंदा अमरावती केंद्रावर एकंदर ५९ बालनाट्य सादर होणार असून ही स्पर्धा २० जानेवारी पर्यंत चालणार आहे. या स्पर्धेचे उदघाट्न शनिवार दि. १३ रोजी सकाळी १०.०० वाजता जेष्ठ रंगकर्मी सुरेश बारसे आणि अ. भा. मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती शाखा, मुंबई चे नियामक मंडळ सदस्य ॲड. प्रशांत देशपांडे यांचे हस्ते संपन्न होणार आहे. संपूर्ण स्पर्धेला उपस्थित राहून बाल कलाकारांना प्रोत्साहित करावे अशी विनंती रसिक आणि कलाप्रेमीना या सोर्धेचे समन्वयक ॲड. चंद्रशेखर डोरले आणि सहसमन्व्यक विशाल फाटे यांनी केली आहे.

## ठाकरे गटाच्या नेत्यांमध्ये संघर्ष?; संजय राऊत म्हणाले, कुणीतरी एखादा नतद्रष्ट...

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या कित्येक महिन्यांपासून सुरू असलेल्या ठाकरे-शिंदे सत्तासंघर्षावर अखेर विधानसभा अध्यक्षांनी निकाल सुनावला. एकनाथ शिंदेंची खरी शिवसेना असून त्यांच्या आमदारांना अपात्र करणारी याचिका फेटाळून लावली. मात्र या निकालानंतर ठाकरे गटात अंतर्गत संघर्ष सुरू झाल्याची बातमी समोर आली. निवडणूक आयोगाला देण्यात आलेल्या



कागदपत्रांच्या पूर्ततेत ती प्रक्रिया नीट हाताळली गेली नाही त्यामुळे एकमेकांवर खापर फोडले जात आहे असं पुढे आले आहे.

एका इंग्रजी दैनिकाने सूत्रांच्या हवाल्यानं दिलेल्या बातमीत म्हटलंय की, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आमदार अपात्रतेचा निकाल दिल्यानंतर उद्धव ठाकरे गटाच्या नेत्यांची तातडीनं बैठक बोलावण्यात आली. मातोश्री निवासस्थानी ही बैठक पार पडली. अध्यक्षांच्या निकालाविरोधात सुप्रीम कोर्टात दाद मागण्याचे ठरले. परंतु बैठकीत पक्षाच्या प्रशासकीय कामाची जबाबदारी असणाऱ्या नेत्यांवर खापर फुटले. २०१८ मध्ये बदललेली घटना दुरुस्तीची आवश्यक कागदपत्रे पुरवण्यात ते अपयशी ठरले त्यामुळे आज पक्षाविरोधात निकाल गेला अशी नाराजी काही नेत्यांनी व्यक्त केली. या कागदपत्रांची पूर्तता करण्याची जबाबदारी खासदार अनिल देसाई आणि माजी मंत्री सुभाष देसाई यांच्यावर होती.

२०१८ मध्ये पक्षात झालेल्या घटनादुरुस्तीला निवडणूक आयोगाची मान्यता नव्हती. त्यामुळे १९९९ ची पक्षाची घटना ग्राह्य धरून नार्वेकरांनी निकाल सुनावला. ज्यात एकनाथ शिंदेंकडे शिवसेना दिली आणि त्यांच्या आमदारांविरोधात असलेली अपात्रतेची याचिका फेटाळून लावली असं म्हटलं जाते. संजय राऊत देखील या बैठकीला उपस्थित होते.

## ठाकरे गटालाही लागू असेल गोगावलेंचा व्हीप : नार्वेकर

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

विधिमंडळात शिवसेना हाच पक्ष आहे. एका पक्षात दोन व्हीप असू शकत नाहीत. शिवसेना एकनाथ शिंदे यांची असून, भरत गोगावले हे प्रतोद आहेत. ठाकरे गटाचे आमदारही शिवसेनेचे असून, गोगावले यांचा व्हीप त्यांना लागू होईल, असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितले.



प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना नार्वेकर यांनी व्हीपबाबतची शंका दूर केली. मूळ राजकीय पक्षाबाबत निर्णय दिला आहे. व्हीप म्हणून ज्या भरत गोगावले यांना मान्यता दिली आहे, त्यांचाच व्हीप दोन्ही गटांना लागू होईल. ज्यावेळी नरहरी झिरवळ यांनी सुनील प्रभू आणि अजय चौधरी यांना निवडले, त्यावेळी २१ जून २०२२ रोजी त्यांच्याकडे फक्त उद्धव ठाकरे यांचेच पत्र होते, एकनाथ शिंदे यांचे नव्हते. एकच राजकीय पक्ष असल्याचे वाटल्याने त्यांनी प्रभू आणि चौधरी यांची निवड केली.

**कायदेशीर सल्ला घेऊ : सुनील प्रभू**

व्हीप प्रामुख्याने अधिवेशन काळात लागू असतो. सध्या अधिवेशन नाही. त्यामुळे व्हीपबाबत तोपर्यंत आम्ही कायदेशीर सल्ला घेऊ, अशी प्रतिक्रिया ठाकरे गटाचे नेते आमदार सुनील प्रभू यांनी दिली.

## संपादकीय ......

# एका राजकीय संघर्षाचा इतिहास

*मी इतिहासाला कवटाळत बसणारा नेता नाही. त्यामूळेच पुढच्या काळात 'भारिप-बहूजन महासंघ' आपण 'वंचित बहूजन आघाडी'त विलिन करणार आहोत!. तेंव्हाच्या भारिप-बहूजन महासंघाचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकरांच्या या दोन वाक्यानं राज्यातील 'भारिप-बमसं' या शब्दाशी जुळलेला प्रत्येकजण स्तब्ध झाला होता. जिथे आंबेडकरांनी हा निर्णय जाहीर केला, त्या अकोल्यातील त्यांचं निवासस्थान असलेल्या 'यशवंत भवन'च्या भिंतीही या निर्णयानं काही काळ थिजून गेल्या होत्या. कारण, 'भारिप-बहूजन महासंघ' या राजकीय चळवळीतील प्रत्येक चढ-उतारांची ही मुक वास्तू आणि तिच्या भिंतीही साक्षीदार होत्या. ही घटना आहे साधारणत: जानेवारी २०१९ मधील. तेंव्हा २०१९ च्या लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजायला सुरूवात झाली होती. तेंव्हा आंबेडकरांनी टाकलेल्या या 'विलिनीकरण बाँब'नं राजकीय पंडीतही चाट पडले होते.*

*प्रकाश आंबेडकरांचा हा निर्णय वरकरणी साधा वाटत असेलही. मात्र, 'भारिप' ते भारिप-बमसं'... अन 'भारिप-बमसं' ते 'वंचित बहूजन आघाडी' हा प्रवास एका राजकीय वाटचालीतील नावाच्या स्थित्यंतराचं वर्तूळ पुर्ण करणारा होता. बाळासाहेब आंबेडकरांच्या तेंव्हाच्या या निर्णयात अनेक अर्थ, मर्म आणि संदर्भ दडलेले होते. प्रकाश आंबेडकरांच्या या निर्णयामुळे राज्याच्या राजकारणातल्या रिपब्लिकन चळवळीतील 'भारिप-बहूजन महासंघ' नावाचं एक वादळी 'पर्व' संपलं होतं. पुढे गेल्या पाच वर्षांत वंचित बहुजन आघाडीनं राज्याच्या राजकीय क्षितीजावर एक नवी ताकद निर्माण केली. आकड्यांच्या खेळात वंचितला फारसं यश मिळालं नसलं तरी वंचितनं महाराष्ट्रातील प्रस्थापित पक्षांना आपली दखल घ्यायला मात्र भाग पाडलं आहे.*

*प्रकाश आंबेडकरांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'नातू' ही ओळख वारशानं मिळालेली. मात्र, राजकारणानं त्यांना 'आंबेडकर' या ओळखीच्या भांडवलावर कधीच 'प्रस्थापित' आणि 'स्थिर' होऊ दिलं नाही. देशातील राजकारणात राजकीय घराण्यांच्या 'घराणेशाही'चा कायम बोलबाला राहिला आहे. मात्र, नियतीनं प्रकाश आंबेडकरांना ते 'आंबेडकर' असण्याचा 'लाभ' कधीच मिळू दिला नाही.*

*प्रकाश आंबेडकरांनी निर्माण केलेला 'भारतीय रिपब्लिकन पक्ष' अर्थातच 'भारिप'चा इतिहास, वाटचाल अतिशय संघर्षाच्या वळणांनी भरलेला होता. प्रकाश आंबेडकरांच्या तब्बल ४० वर्षांच्या राजकीय संघर्षाला गेल्या पाच-सहा वर्षांत चांगले दिवस आलेत. त्यांनी पाच वर्षांपुर्वी 'भारिप-बमसं'ला अधिक व्यापक करीत 'वंचित बहूजन आघाडी'ची स्थापना केली. अन हाच राजकीय प्रयोग आंबेडकरांना नवं राजकीय 'बुस्टर' देणारा ठरला. या बुस्टरमध्ये त्यांना कायम राजकीय 'एनर्जी' देणारा दलित, आंबेडकरांना मानणारा ओबीसी, याबरोबरच त्यांच्या 'अकोला पॅटर्न मॉडेल' मधील लहान समाज घटक (मायक्रो मायनॉरिटीज) हे होतेच. या नव्या प्रयोगात आदिवासी, सत्तेत वाटा न मिळालेले मराठे आणि काही प्रमाणात अल्पसंख्यांक या नव्या प्रयोगात त्यांच्यासोबत जुळलेत. त्यामूळे हेच 'बुस्टर इज सिक्रेट ऑफ माय एनर्जी' असं म्हणत आंबेडकरांनी 'वंचित बहूजन आघाडी' ही आपली नवी राजकीय ओळख दृढ करण्याचा निर्णय घेतला.*

*पाच वर्षांपुर्वी आंबेडकरांनी आपला 'वंचित बहूजन आघाडी' हा नवा पत्ता अधिकाधिक व्यापक करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या यशापयाशाचा लेखाजोखा वर्ष २०२४ मध्ये लिहिला जाईल. याचं मुल्यमापन लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत होणार आहे. हा सर्व मागोवा घेतांना प्रकाश आंबेडकरांची राजकारणातील 'एंट्री' ज्या नावापासून झाली त्या 'भारिप-बहूजन महासंघा'चा इतिहास, वाटचाल, यश आणि चढ-उतारांचा उहापोह होणं गरजेचं आहे.*

# श्री संत अच्युत महाराजांचा जन्मशताब्दी सोहळा

## वरुड येथे २० ते २८ जानेवारी विविध कार्यक्रम

### शुभारंभाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

### समारोपाला उपमुख्यमंत्रीद्वय राहणार





**दि.१२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** - विदर्भाचे ज्ञानेश्वर म्हणून ओळखले जाणारे प. पु. वंदनिय गुरुमाऊली श्री संत अच्युत महाराज यांचा जन्मशताब्दी महोत्सव त्यांचे जन्मगाव वरुड येथे विविध धार्मिक कार्यक्रमांनी २० ते २८ जानेवारी दरम्यान साजरा होणार आहे. पुढे वर्षभर वेगवेगळ्या ठिकाणी कार्यक्रम होतील, अशी माहिती श्री संत अच्युत महाराज जन्मशताब्दी उत्सव समिती, वरुडचे अध्यक्ष सुधीर दिवे यांनी गुरूवारी पत्रकार परिषदेत दिली.

वरूड येथील श्री संत अच्युत महाराज सभागृहात सर्व कार्यक्रम होणार आहेत. २० जानेवारीला दुपारी जन्मशताब्दी महोत्सवाचा शुभारंभ केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याहस्ते होईल. कार्यक्रमाला खा. रामदास तडस, खा. अनिल बोंडे, खा. नवनीत राणा, आ. बच्चू कडू, आ. प्रताप अडसड, आ. देवेंद्र भुयार, आ. सुलभा खोडके, आ. यशोमती ठाकूर, आ. रवि राणा, आ. बळवंत वानखडे, आ. दादाराव केचे, आ. राजकुमार पटेल, आ. प्रवीण पोटे, मुलताईचे आ. चंद्रशेखर देशमुख, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, माजी आ. गिरीश गांधी, माजी आ. नरेशचंद्र ठाकरे उपस्थित राहणार आहेत.

उत्सवाची सुरूवात व्यास पुजन व कलश स्थापनेसह '१०० कोटी अच्युताय नमः' नामजप व शंभर कुंडी गायत्री व विष्णूयाग यज्ञाने होईल. हा यज्ञ २१ ते २७ जानेवारीपर्यंत दररोज होईल. त्याशिवाय दररोज श्रीमद भागवत कथा प्रवचन सचिन देव महाराज व केशवराव भोंडे महाराज यांचे ग्रामगीता पारायण होईल. रविवारी २१ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता पंडित अजित कडकडे यांची भजन संध्या होईल. २२ जानेवारीला श्री संत अच्युत महाराज साहित्य संमेलन होईल. या संमेलनाचे उदघाटन प्रसिद्ध वक्ते प्रा. डॉ. अरविंद देशमुख करतील. संमेलनात रायजीप्रभू शेलोटकर, पौर्णिमा सवाई, मुळे शास्त्री महाराज, रंजना फरकाडे, डॉ. माया आंडे, पुष्पा वरखेडकर भाष्य करतील. अध्यक्षस्थानी प्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. साजिद शाह राहतील. ते श्री संत अच्युत महाराज यांनी लिहलेल्या १०० पेक्षा जास्त ग्रंथावर विवेचन करणार आहेत.

श्री संत अच्युत महाराज जन्मदिनी २७ जानेवारीला संत मेळावा आयोजिण्यात आला आहे. प. पु. श्री जितेंद्रनाथ महाराज आणि जगतगुरु रामराजेश्वर माऊली सरकार व अनेक थोर संत मंडळी उपस्थितीत राहतील. दुपारी ४.३० वाजता संत अच्युत महाराजांचे चरित्र किर्तन होईल. सायंकाळी ५.३५ वाजता महाराजांचा जन्मोत्सव होईल. त्यानंतर लगेच १०० माता व शिशुंचा सत्कार करण्यात येईल. २८ जानेवारीला सकाळी संत अच्युत महाराजांची भव्य शोभायात्रा निघेल. त्यानंतर काल्याचे कीर्तन होईल. लगेच समारोपीय कार्यक्रमाला प्रमखु पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्रीद्वय देवेंद्र फडणवीस व अजित पवार उपस्थित राहणार आहेत. पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांचीपण उपस्थिती राहील. हभप सचिन देव महाराज यांचे समारोपीय प्रवचन होईल. शताब्दी उत्सवाच्या सर्व कार्यक्रमांना भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन श्री संत अच्युत महाराज जन्मशताब्दी उत्सव समितीच्या सदस्यांनी केले आहे. पत्रकार परिषदेला सचिन देव महाराज, डॉ. अनिल सावरकर, मनोज वाडेकर, सागर पासेबंद, शुभदा पोतदार, सुधीर जोशी, दत्ता शिंदे, डॉ. श्रीकांत देशमुख, डॉ. डहाणे, गिरीधर देशमुख उपस्थित होते.

# प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा - जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**दि१२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,**- औजारे व साधने यांचा वापर करुन तसेच हातांनी काम करणाऱ्या पारंपारीक कारागिर आणि हस्तकलेच्या वस्तूंची निर्मिती करणाऱ्यांना ओळख प्राप्त करुन देण्यासाठी आणि त्यांना सर्वांगिण आधार देऊन त्यांचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना मंजूर केली आहे. या योजनेचा जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी. तसेच योजनेच्या लाभापासुन कोणीही पारंपारिक कारागिर वंचित राहु नये, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी सरपंच व नगरपरिषद कर्मचारी यांना केले.



सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग कार्यालय नागपुर आणि महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ अमरावती यांच्या सयुक्त विद्यमाने स्थानिक बचत भवन येथे आयोजित पी एम विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेतंर्गत जनजागृती कार्यक्रमात श्री. कटियार बोलत होते. यावेळी सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग कार्यालयाचे राहुलकुमार मिश्रा, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी श्री. खरे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रदीप चेचर, कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शक केंद्राचे सहाय्यक आयुक्त प्रांजली बारसकर आदी उपस्थित होते.श्री. कटियार म्हणाले की, योजनेअंतर्गत १८ पारंपारिक उद्योगाचा समावेश करण्यात आला आहे. योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीमध्ये सरपंचाची महत्वाची भुमिका आहे. त्यांनी आपआपल्या गावांतील पारंपारिक कारागिरांपर्यंत योजनेची माहिती पोहचवुन त्यांना या योजनेअंतर्गत नोंदणी करण्याकरीता प्रोत्साहीत करावे. तसेच सरपंच यांनी तातडीने कारागीराची पडताळणी करुन सर्व अर्ज पुढील टप्पात पाठवावे, अशा सुचना जिल्हाधिकारी यांनी केल्या.

कार्यक्रमाचे प्रास्तवीक जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदीप चेचरे यांनी केले. तर सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग कार्यालयाचे श्री. खरे यांनी पीएम विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेचे सादरीकरण केले. तसेच सहाय्यक आयुक्त बारस्कर व पंकजकुमार जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

### योजनेमधून नोंदणीकृत कारागिरांना मिळणारे लाभ

कौशल्य पडताळणी नंतर ५ ते ७ दिवस मुलभूत प्रशिक्षण, इच्छुक उमेदवार १५दिवस प्रगत प्रशिक्षण, प्रशिक्षण विद्यावेतन दररोज ५०० रुपये, टूलकिट प्रोत्साहन १५ हजार रुपये अनुदान, तारणमुक्त व्यवसायिकता विकास कर्ज १ लक्ष रुपये आणि २ लक्ष रुपये, सवलतीचा व्याजदर एनएसएनईव्दारे ८ टक्के व्याज सवलत मर्यादेसह लाभार्थीकडून ५ टक्के व्याज, या कर्जासाठी क्रेडीट गॅरंटी फी केंद्र शासन उचलेल, डिजिटल व्यवहारासाठी प्रोत्साहन जास्तीत-जास्त १०० व्यवहारांसाठी प्रति व्यवहार १ रुपये, विपणन समर्थन नॅशनल कमिटी फॉर मार्केटिंग गुणवत्ता प्रमाणपत्र, ब्रँडींग आणि प्रमोशन, ई-कॉमर्स लंकेज, व्यापार मेळावे जाहिरात, प्रसिध्दी आणि इतर विपणन यासारख्या सेवा प्रदान करेल.कलर बॉक्स*योजनेसाठी पात्र लाभार्थी* असंघटित क्षेत्रात स्वयंरोजगार तत्त्वावर अवजारांची काम करणारे कारागिर, १८ कुटुंब आधारित पारंपारीक व्यवसायांपैकी एका व्यवसायात गुंतलेला कारागीर, नोंदणीच्या तारखेस लाभार्थ्याचे किमान वय १८ वर्षे असावे. या योजनेंतर्गत नोंदणी असलेली व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय या योजनेसाठी पात्र ठरणार नाहीत.

### योजनेची ठळक वैशिष्ट्ये

पारंपारीक कारागिर यांना विश्वकर्मा म्हणून मान्यता देणे, त्यांचे कौशल्य वाढविण्यासाठी कौशल्य वृध्दी प्रदान करणे, व्यवसायासंबंधित आणि योग्य प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देणे, चांगल्या आणि आधुनिक साधनांसाठी सहाय्य प्रदान करणे, विनातारण, सवलतीच्या व्याजदरात सहज कर्ज उपलब्ध करुन देणे, डिजिटल व्यवहारासाठी प्रोत्साहन देणे, ब्रँड प्रमोशन आणि मार्केट लिंकेजसाठी एक व्यासपीठ प्रदान करणे ही या योजनेची वैशिष्ट्ये आहेत.

# महायुतीची लोकसभेची तयारी, १४ जानेवारी पहिला मेळावा

## राज्यात एकाच दिवशी विविध ठिकाणी महायुतीचा मेळावा घेण्याचे आदेश

**दि. १२ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर-** लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी कॉंग्रेस अजितदादा गट यासह सात पक्षांच्या महायुतीचा मेळावा १४ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे. पालकमंत्री चंद्रकांत पाटील या मेळाव्याला मार्गदर्शन करतील, अशी माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी गुरुवारी दिली. आमदार कल्याणशेट्टी म्हणाले, राज्यात एकाच दिवशी विविध ठिकाणी महायुतीचा मेळावा घेण्याचे आदेश तीनही पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी दिले आहेत. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीची बूथ बांधणी करणे, तालुकास्तरावर सभा घेण्याचे नियोजन करणे यासह विविध मुद्यांवर महायुतीचे पदाधिकारी काम करणार आहेत. सोलापूर लोकसभा मतदारसंघ भाजपकडेच राहिल. भाजपचा उमेदवार अद्याप निश्चित झालेला नाही.




## मॅरेथॉनची तयारी करताय? मग धावण्याआधी 'अशी' वाढवा रोगप्रतिकारशक्ती

*__दि.११विदर्भ प्रजासत्ताक__ - आता थंडीच्या दिवसांमध्ये अनेक ठिकाणी मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी उत्सुक असतात. दरवर्षी हजारो नागरिक उस्फुर्तपणे मॅरेथॉनमध्ये सहभागी होतात. मॅरेथॉनमध्ये कोणतीही पूर्वतयारी न करता धावल्यामुळे अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. बरेच लोक त्यांच्या फिटनेस पातळीची चाचणी घेण्यासाठी देखील मेरेथॉनमध्ये सहभागी होतात. तरुणांप्रमाणेच ज्येष्ठ नागरिकही या शर्यतीत उत्साहाने सहभागी होत असल्याचे पहायला मिळते. त्यापूर्वी मात्र तुमची प्रतिकारशक्ती कशी वाढविता येईल याविषयी जाणून घेणे आवश्यक आहे.*

*__रोगप्रतिकारशक्ती वाढविणे का गरजेचे__- धावण्यामध्ये प्रतिकारशक्ती महत्त्वाची भूमिका बजावते. आपल्या शरीराचे संक्रमणांपासून संरक्षण करणे आणि आपल्याला निरोगी ठेवण्यास रोगप्रतिकारशक्ती मदत करते. लांब पल्ल्याच्या शर्यतीमध्ये रोगप्रतिकारक शक्ती तात्पुरती कमकुवत होऊ शकते, ज्यामुळे धावपटू आजारांना बळी पडतात. याचे कारण असे की तीव्र शारीरिक हालचाली शरीरावर अतिरिक्त ताण निर्माण करतात. त्यामुळे, रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करणे आवश्यक आहे असे 'अपोलो स्पेक्ट्रा'मधील इंटरनल मेडिसिन एक्सपर्ट डॉ. छाया वाजा यांनी सांगितले.*

*__असा करा उपाय-__ प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी पोषक तत्वांनी युक्त संतुलित आहाराचे सेवन करणे गरजेचे आहे. भरपूर फळे आणि पालेभाज्यांचा आहारात समावेश करा, त्यामध्ये जीवनसत्त्वे आणि अँटिऑक्सिडंट्सचे प्रमाण अधिक असते. यामुळे तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत होऊ शकते. याव्यतिरिक्त, आपल्या आहारात प्रोबायोटिक्स समाविष्ट केल्याने आतड्याच्या आरोग्यास चालना मिळते, जी संपूर्ण प्रतिकारशक्तीशी संबंधित आहे.*

*पोषणाव्यतिरिक्त तणाव पातळीचे व्यवस्थापन करणे देखील आवश्यक आहे. उच्च ताणतणावामुळे शरीराची संक्रमणांशी*



*लढण्याची क्षमता कमी होऊ शकते, म्हणून मेडिटेशन, योगसाधना किंवा छंद जोपासून तणाव कमी करण्याचा प्रयत्न करावा. याचा आपल्या प्रतिकारशक्तीवर सकारात्मक परिणाम होतो. एक मजबूत रोगप्रतिकारक प्रणाली राखण्यासाठी पुरेशी झोप घेणे महत्वाचे आहे. रात्री ७-८ तासांची झोपेचे घ्यावी. जेणेकरून तुमच्या शरीराला पुरेशी विश्रांती तसेच धावण्यासाठी आवश्यक ऊर्जा आणि लवचिकता मिळेल.*

*ध्यानधारणा, श्वासोच्छवासाचे व्यायाम आणि नियमित शारीरिक हालचाली यासारख्या सरावांमध्ये गुंतल्याने तणावाची पातळी कमी होण्यास मदत होते, एकूणच रोगप्रतिकारक शक्ती सुधारते आणि शरीराचे कार्य सुरळीत राखण्यास मदत होते.*

# रेशन दुकानदारांचा संप मिटला, आज पासून धान्य उचल करण्याचे आदेश

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** रेशनवर स्वस्त आणिमोफत वस्तू देण्याच्या घोषणा दिवसेंदिवस वाढत आहेत. या साहित्याच्या वितरणाची जबाबदारी असलेल्या रेशन दुकानदारांची यामुळे कोंडी होत आहे. यामुळे त्रस्त झालेले रेशन दुकानदारांनी १ जानेवारीपासून रेशन दुकानदारांनी संप पुकारला होता. यावर बुधवारी रात्री उशिरा अन्न नागरी पुरवठा मंत्री तसेच रेशन दुकानदारांमध्ये झालेल्या चर्चेनंतर दहाव्या दिवशी संपाचा तिढा सुटला आहे.

महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व किरकोळ केरोसीन परवानाधारक महासंघ व ऑल इंडिया वेलफेअर प्राईज शॉप डीलर्स फेडरेशन यांच्या नेतृत्वात राज्यातील रास्त धान्य दुकानदारांच्या प्रलंबित मागण्यांसाठीनवीन वर्षाच्या पहिल्याच दिवसापासून रेशन दुकानदारांनी संप पुकारला होता. याची दखल घेत राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळाला १० जानेवारीला चर्चेसाठी बोलविण्यातआले होते. या बैठकीत रेशन दुकानदारांच्या प्रलंबित असलेल्या १६ मागण्याबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यावर तत्काळ कारवाईचे आदेश मंत्री छगन भुजबळ यांनी दिले. सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत नवीन धोरण लवकर जाहीर करण्यात येईल. कमिशनमध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात येणार असून त्यावर लवकरच निर्णय येईल. याबाबत माहिती कळविली जाणार आहे. शासनाने रेशन दुकानदारांना मागणीची दखल घेतल्यामुळे सदरचा संप स्थगित करण्यात आला. या बैठकीला प्रधान सचिव सुमंत भांगे, सहसचिव तातोबा - कोळेकर, नितीन सोनखासकर, तर - महासंघाचे अध्यक्ष डी. एन. पाटील, चंद्रकांत यादव, राजेंद्र अंबुसकर उपस्थित होते.



### रेशन धान्याची उचल, वितरण सुरू

दहा दिवसापासून जिल्ह्यातील रेशन दुकानदारांनी बेमुदत संप पुकारला होता. परिणामी लाखो रेशनकार्डधारक लाभार्थीना गैरसोयीचा सामना करावा लागला. अशातच आता संप मिटल्यामुळे जिल्ह्यातील सर्व रेशन दुकानदारांनी धान्याची उचल व वितरण सुरू करावे, असे आवाहन जिल्हा प्राधिकृत स्वस्त धान्य दुकानदार व किरकोळ केरोसीन परवानाधारक वेलफेअर संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश उल्हे यांनी केले.

समस्त नागरिकांना राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा
जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती
'जिजाऊ' प्लॉट नं.३३ व ३४, वालकट कंम्पाउंड, अमरावती फोन: २५६००५७ फॅक्स (०७२१)२५६६१५६
शुभेच्छूक: सर्व संचालक मंडळ जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती
ठेवीचे दर
8.50% १२ महिन्यांकरिता
9.00% ज्येष्ठ नागरिकांकरिता

# डॉक्टरांना आता कॅपिटल अक्षरात प्रिस्क्रिप्शन लिहावी लागणार

## 'झिग-झॅग' लिहिणं बंद करा; हायकोर्टाचा आदेश



**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** डॉक्टरांची चिठ्ठी म्हटलं की, सर्वसामान्यांना जणू ते नक्षीकामचं वाटतं. डॉक्टरांचं झिग-झॅग लिखाणं समजणं, हा सर्वसामान्यांसाठी एक टास्कच आहे. पण, आता डॉक्टरांना आता कॅपिटल अक्षरात प्रिस्क्रिप्शन लिहावी लागणार आहे. ओदिशा उच्च न्यायालयाने एका महत्त्वपूर्ण निर्णयात डॉक्टरांसाठी महत्त्वाचे निदेश दिले आहेत. 'झिग-झॅग' लिहिणं बंद करा, असा आदेश ओदिशा हायकोर्टाने दिला आहे. ओडिशा उच्च न्यायालयाने राज्यातील सर्व डॉक्टर आणि खासगी रुग्णालयांना मोठे आणि महत्त्वाचे निर्देश दिले आहेत.

डॉक्टरांना आता कॅपिटल अक्षरात प्रिस्क्रिप्शन लिहावी लागणार बोल्ड करणे

आता डॉक्टरांना आता चिठ्ठी लिहिताना स्पष्ट आणि सुवाच्य हस्ताक्षरात किंवा कॅपिटल अक्षरात लिहावी लागतील. राज्यातील सर्व डॉक्टर, खाजगी रुग्णालये आणि वैद्यकीय केंद्रांना यापुढे सर्व प्रिस्क्रिप्शन, पोस्टमार्टम अहवाल आणि वैद्यकीय-कायदेशीर कागदपत्रे स्पष्ट आणि सुवाच्य हस्तलिखितात किंवा मोठ्या अक्षरात लिहिण्याचे निर्देश दिले आहेत.

न्यायमूर्ती एसके पाणिग्रही यांनी मुख्य सचिवांना या आदेशाची प्रत सर्व वैद्यकीय केंद्रे, खाजगी दवाखाने आणि वैद्यकीय महाविद्यालयांना पाठवण्याचे निर्देश दिले आहेत.

### सर्व डॉक्टर आणि खासगी रुग्णालयांना महत्त्वाचा निर्देश

डेंकनाल जिल्ह्यातील हिंडोल येथील रसनंद भोई यांचा मोठा मुलगा सौवाग्या रंजन भोई याचा साप चावल्याने झाला. मुलाच्या मृत्यूनंतर त्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणीनंतर हायकोर्टाने हा आदेश दिला आहे. डॉक्टरांनी प्रिस्क्रिप्शन लिहिताना स्पष्ट हस्ताक्षर वापरावं, ज्यामुळे औषधांच्या नावे सर्वसामान्यांनाही वाचता येतील आणि कोणतीही संदिग्धता राहणार नाही, असं न्यायालयाने आदेशात स्पष्टपणे नमूद केलं आहे.

### 'झिग-झॅग' लिहिणं बंद करा, हायकोर्टाचा आदेश

उच्च न्यायालयाने म्हटलं आहे की, अनेक प्रकरणांमध्ये, शवविच्छेदन अहवाल लिहिताना बहुतेक डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे वैद्यकीय-कायदेशीर कागदपत्रांच्या समजून घेताना अडचण निर्माण होते. न्यायालयालाही अशी वैद्यकीय कागदपत्रे वाचणे कठीण जातं. न्यायालयाने पुढे म्हटलं की, डॉक्टरांमध्ये झिग-झॅग हस्ताक्षराचा ट्रेंड बनला आहे, ज्यामुळे सामान्य व्यक्ती आणि न्यायव्यवस्थेला ही कागदपत्रे वाचणं कठीण होत आहे. उच्च न्यायालयाच्या या नवीन आदेशामुळे आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा अपेक्षित आहे. त्यासोबतच कागदपत्रे वाचणे आणि समजणं सोपे होईल, याची खात्री होईल, त्यामुळे गैरसमज आणि त्रुटींची शक्यता कमी होईल.



# खोके सरकारची शाळा महाविद्यालयांमध्ये मतदार शोध मोहीम – अ‍ॅड. ठाकूर

**दि.१२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** राज्यातील खोके सरकारने आता निर्लज्जपणाचा कळस गाठला आहे. धर्माच्या आधारे राजकारण करण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू असताना आता शाळा महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनाही वेठीस धरण्याचा प्रयत्न चालवला आहे. खोके सरकारने चक्क शाळा महाविद्यालयांमध्ये प्रचार सुरू केला आहे,असा आरोप काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी मंत्री अँड. यशोमती ठाकूर यांनी केला आहे. राज्य सरकारच्या वतीने राज्यभरात आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विविध माध्यमातून प्रचाराचा धडाका सुरू आहे. राज्यातील जनता महागाई आणि गरिबीच्या खाईत ढकलली गेली असताना, सरकार मात्र उत्सवी राजकारणाची गोळी जनतेला देत आहे. वर्षानुवर्ष चालत आलेल्या सण परंपरांना इव्हेंटचे स्वरूप देऊन लोकांचे लक्ष मूळ प्रश्नांवरून बाजूला हटवण्याचा प्रकार राज्य आणि केंद्र सरकारच्या वतीने सुरू आहे. सध्या धार्मिक वातावरण निर्माण करून जनतेचे लक्ष महागाई आणि बेकारी यासारख्या प्रश्नांवरून वळवण्याचा प्रयत्न सुरू असतानाच आता शाळेतील विद्यार्थी आणि महाविद्यालयीन तरुणांना प्रचाराचा भाग बनवले जात आहे असेही ड. ठाकूर म्हणाल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विश्वगुरू आणि विश्व शिक्षक बनल्याचा आव आणून विद्यार्थ्यांशी संवाद साधतात. त्यानिमित्ताने आपल्या पक्षाचा अजेंडा राबवत प्रचार करतात त्यांचाच कित्ता आता राज्यातील शिंदे फडणवीस पवार यांच्या सरकारने गिरवायला सुरुवात केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावाने शालेय विद्यार्थी आणि महाविद्यालयीन तरुणांसाठी राज्य सरकार कोणकोणत्या योजना राबवत आहे आणि कशाप्रकारे विद्यार्थ्यांसाठी काम करीत आहे. याचे दोन पानी पत्र शाळा महाविद्यालयांमध्ये वितरित केले जात आहे. विशेष म्हणजे काही शाळा महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू असताना शिक्षकांनी आणि प्राध्यापकांनी मुख्यमंत्र्यांचे हे पत्र विद्यार्थ्यांना वितरित केले आहे. स्वतःची राजकीय पोळी भाजण्यासाठी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही प्रचाराचे साधन बनवून राज्य सरकारने निर्लज्जपणाचा कळस गाठला आहे. सरकारला जर काय करायचे असेल, तर सरकारने आधी दर्जेदार शिक्षण दर्जेदार सुविधा आणि तरुणांच्या हाताला काम द्यावे. केवळ पत्रकबाजी करून प्रचार करू नये, असेही ड. यशोमती ठाकूर यावेळी म्हणाल्या.

# तुम्ही भूमिहीन आहात, शेतीसाठी मिळेल १०० टक्के अनुदान; करा झटपट अर्ज

## मिळेल हक्काची जमीन : सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाची योजना



**दि.१२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबलीकरण योजनेच्या माध्यमातून भूमिहीनांना १०० टक्के अनुदानावर शेती दिली जाते. सदर योजनेचा लाभ जिल्ह्यातील अल्प भूमिहीनांना मिळत असल्याचे दिसून येते.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबलीकरण योजनेद्वारे अनुसूचित जातीतील भूमिहीन शेतमजुरांना लाभ दिला जातो. जिल्ह्यात सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत या योजनेची स्थानिक स्तरावर अंमलबजावणी केली जात आहे. या योजनेमुळे जिल्हाभरातील अनेक शेतमजूर सुद्धा जमिनीचे मालक बनले आहेत. त्यांना आता हक्काची शेती मिळाल्याचे दिसून येते. परंतु सदर योजनेबाबत व्यापक प्रमाणात जागृती करणे गरजेचे आहे.कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेअंतर्गत १०० टक्के अनुदानावर जमिनीचा लाभ घेण्यासाठी भूमिहीनांना सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या कार्यालयात अर्ज सादर करावा लागतो. अर्जासमवेत भूमिहीन असल्याचे प्रमाणपत्र, अर्जदाराचे आधारकार्ड, रेशन कार्ड, जात प्रमाणपत्र यासह रहिवासी प्रमाणपत्र आदींसह आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी लागते.

### काय आहे योजना?

अनुसूचित जाती प्रवर्गातील भूमिहीनांना हक्काची शेतजमीन मिळावी यासाठी १०० टक्के अनुदानावर शेतजमीन दिली जाते.

योजनेच्या माध्यमातून शासन भूमिहीनांना शेतजमीन उपलब्ध करून देऊन त्यांना उपजीविकेचे साधन मिळवून देते.

### जनजागृतीचा अभाव

भूमिहीनांना १०० टक्के अनुदानावर शेतजमिनीचा लाभ दिला जाते. परंतु सदर योजनेबाबत सामाजिक न्याय विभागामार्फत जिल्ह्यात जनजागृती केली जात नसल्याचे दिसून येते. जनजागृतीअभावी या योजनेचा पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्यास अडचणी येत आहेत.

# उत्तर प्रदेशनंतर गोव्यातही २२ जानेवारीला शासकीय सुट्टी, महाराष्ट्रातही भाजप नेत्याची मागणी!

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** अयोध्येतील राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याच्या निमित्ताने २२ जानेवारी रोजी उत्तर प्रदेश आणि गोव्यामध्ये शासकीय सुट्टी जाहीर करण्यात आली आहे . २२ जानेवारी रोजी गोवा आणि उत्तर प्रदेशमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना आणि शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दोन दिवसांपूर्वी याबाबतचा निर्णय घेतला होता. तर गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी याबाबत आज घोषणा केली आहे. २२ जानेवारी रोजी राम मंदिर सोहळ्यानिमित्ताने महाराष्ट्रातही सरकारी सुट्टी जाहीर करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्रातील भाजप नेत्यानेही केली आहे. राज्य सरकारकडून याबाबत अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

**२२ जानेवारीला गोव्यात शासकीय सुट्टी –** गोव्याचे मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांनी २२ जानेवारी रोजी गोव्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना आणि शाळांना सुट्टी जाहीर केली आहे.



राम मंदीर सोहळ्याच्या निमित्ताने गोव्यात २२ जानेवारीला सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तसेच सर्व शाळांनाही सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. गोव्याच्या मुख्यमंत्र्या कडून ही घोषणा करण्यात आली. देशात सर्वत्र दिवाळी उत्सव साजरा करावी, यासाठी गोवा सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांना आणि शाळेना सुट्टी जाहीर केल्याचं सांगण्यात आलेय.

**महाराष्ट्रातही सुट्टी जाहीर करा – भाजप आमदार पोटेंची मागणी –** अयोध्येतील राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याच्या निमित्ताने राज्यामध्ये शासकीय सुट्टी जाहीर करण्याची मागणी भाजप आमदार प्रवीण पोटे यांची केली आहे. उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून २२ जानेवारीला सरकारी सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. राम मंदिर सोहळ्याला दिवाळीचे स्वरूप दिले असल्याने राष्ट्रीय सण म्हणून जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील सर्व शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना हा सोहळा पाहता यावा म्हणून शासकीय सुट्टी जाहीर करण्यात यावी, अशी मागणी पोटे यांनी केली आहे.

## श्री.संत गोरोबाकाका समाजोन्नती बहूउद्देशिय समितीव्दारे

# आदिवासी बांधवांना वस्त्र, साहित्य व औषधींचे वाटप



दि.११विदर्भ प्रजासत्ताक अमरावती.-श्री.संत गोरोबाकाका समाजोन्नती बहूउद्देशिय समितीच्या वतीने नुकतेच सोसाखेडा ता.धारणी येथील २०४ आदिवासी मोठ्या व लहान बंधू भगीनींना वस्त्र,साहित्य व औषधी वितरीत करण्यात आली.या प्रसंगी विदर्भ कुंभार सुधार समितीचे अध्यक्ष श्री.सुधाकर शेंडोकार अध्यक्ष म्हणून तर डॉ.श्रीराम कोल्हे प्रमुख पाहूणे,सरपंच सौ.रुमका कसबेकर,श्री.हिरालाल कसबेकर,श्री.नारायण मावसकर,श्री.श्रावण लडीकर,सुखदेव शनवारे अतिथी म्हणून उपस्थित होते.या प्रसंगीसंचालन श्री.विलास मेहरे यांनी केले.डॉ.श्रीराम कोल्हे यांनी प्रास्ताविका मधून संस्थेच्या उपक्रमाची माहीती दिली.अध्यक्षीय भाषणानंतर श्री.संत गोरोबाकाका समाजोन्नती बहूउद्देशिय समिती व विदर्भ कुंभार समाज सुधार समितीच्या पदाधिकार्यांचे हस्ते साहित्य वितरीत करण्यात आले.जंतनाशक औषधी व जिवनसत्व अ च्या गोळ्यांचे वितरण व्हिट्यामिन एंन्जल या कंपनीच्या सौजन्याने वितरीत करण्यात आले.या प्रसंगी विदर्भ कुंभार सुधार समितीचे सचिव श्री.सुरेंद्र सरोदे,माजी अध्यक्ष प्रा.डॉ.संजय साळीवकर,कार्यकारीणी सदस्य श्री.नंदकीशोर काकडे,श्री.मधुकरराव खांडेकर,श्री.शंकरराव धामणकर,श्री.गजानन माहूलकर,श्री.नितीन घाटोळे,श्री.पंडीतराव जवळेकर,श्री.नंदकिशोर नांदुरकर,श्री.रविंद्र धामणकर,महीला जिल्हाध्यक्ष श्रीमती प्रभाताई भागवत,शहर महीला अध्यक्ष सौ.संगीताताई साळिवकर, मानव अधिकार संस्थेच्या महीला अध्यक्ष सौ.ज्योतीताई बावस्कर, सौ.वंदनाताई काळकर,महीला उपाध्यक्ष सौ. गौकर्णाताई कोल्हे, सौ.विभाताई मांगुळकर, कु. कल्याणी मांगुळकर,कु.चंचल माहूलकर,श्रीमती सविता कोल्हे उपस्थित होते. यानंतर श्री.बाबारावजी बरडे यांचे धारणी येथील फार्म हाउसवर समाजबंधू भगीणींची सभा आयोजित करण्यात आली. सुरूवातीला श्री.गोरोबाकाका,श्री.दक्ष प्रजापती, श्री.भगवान विश्र्वकर्मा यांच्या प्रतीमेचे पाहूण्यांचे हस्ते पुजन करण्यात आले.या प्रसंगी श्री.सुधाकर शेंडोकार,डॉ.श्रीराम कोल्हे,श्री.दिनेश आगरकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.या प्रसंगी सौ.बरडे,सौ.मेहरे सहकुटूंब तसेच श्री.नवलकिशोर प्रजापती चि.निखिल प्रजापती,कासदेकर सरपंच व मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.शेवटी श्री.बाबारावजी बरडे यांनी आयोजित केलेल्या वनभोजणाचा आश्र्वाद घेउन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.कार्यक्रम आयोजनामध्ये धारणी तालूका कार्यकारणीने उत्तम सहकार्य केल्याबद्दल विदर्भ कुंभार समाज सुधार समिती जिल्हा शाखा अमरावती तर्फे आभार व्यक्त करण्यात आले.या कार्यक्रमाकरीता श्री.नंदूभाउ नांदुरकर, डॉ.ईखार,श्री.गजानन माहूलकर,श्री.पंडीत जवळेकर,श्रीमती भागवतताई,श्री.राजेंद्र मांगुळकर ,श्री.धामणकर(चांदुर रेल्वे) यांचे कडून देणगी प्राप्त झाली.त्याबद्दल देणगीदारांचे अध्यक्षांनी आभार मानले.

# बडनेरा येथे प्लास्टिक बॉल क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

## खेळाडूंनी खेळाडू वृत्ती जोपासावी; शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे



**दि.१२विदर्भ प्रजासत्ताकअमरावती –** हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा जयंती महोत्सव शिवसेना अमरावती जिल्हा शाखेतर्फे साजरा करण्यात येत असून या महोत्सव अंतर्गत बडनेरा येथे रात्रकालीन प्लास्टिक बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन १० जानेवारी रोजी सायंकाळी सात वाजता बडनेरा जुनी वस्ती स्थित चमन नगर ग्राउंड येथे शिवसेना जिल्हा प्रमुख सुनील खराटे यांच्या हस्ते पार पडले.या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून माजी नगरसेवक अयुब खान, पोलीस निरीक्षक नितीन मगर ,शेख नूरभाई ,माजी नगरसेवक इम्रान भाई, मुक्तार भाई ,माजी नगरसेवक साबीर भाई ,अक्रम पठाण, माजी नगरसेवक राजू दारोकर,ज्येष्ठ शिवसैनिक कुचीन कैथवास आदी उपस्थित होते .

स्पर्धेचे उद्घाटक शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी यावेळी उपस्थित खेळाडूंना संबोधित केले शारीरिक आरोग्यासाठी खेळ अतिशय महत्त्वपूर्ण असून या स्पर्धेत सहभागी खेळाडूंनी मैत्रीच्या भावनेतून खेळ सादर करून आपल्यातील खेळाडू वृत्तीचा परिचय द्यावा आणि खेळाडू वृत्ती जोपासावी असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले .२० जानेवारी पर्यंत चालणाऱ्या या प्लास्टिक बॉल क्रिकेट स्पर्धेत विदर्भातील तसेच अमरावती जिल्ह्यातील नामवंत संघ व खेळाडू सहभागी झाले आहे .बडनेरा येथील नवाब ग्रुप या स्पर्धेचे नियोजन करीत असून कामगार शक्ती सेनेचे विदर्भ अध्यक्ष अक्रम पठाण, मो .शारीक पहेलवान ,शाकीर वेल्डर यांच्या मार्गदर्शनात नवाब भाई ,अजहर भाई ,मो शहाज ,अ. अजहर, निलेश सावळे ,शाहरुख हुसेन ,राजू अक्कलवार, शोएब खान ,कुचीन कैतवास ,मोहम्मद शहाज ,फराहन बेग,आदी परिश्रम घेत आहे .

दहा दिवस चालणाऱ्या प्लास्टिक बॉल क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविणाऱ्या संघास शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांच्याकडून २१००० रुपये रोख व मानचिन्ह तसेच उपविजेत्या संघास शोएब भाई कडून रोख ११००० व मानचिन्ह आणि तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या संघास राहील मेमन यांच्याकडून सात हजार रुपये रोख व मानचिन्ह देण्यात येणार आहे .सोबतच मॅन ऑफ द सिरीज, मॅन ऑफ द मॅच ,बेस्ट बॉलर, बेस्ट बॅट्समन ,बेस्ट कॅचर यांना प्रत्येकी दोन हजार रुपये रोख आणि मानचिन्ह देण्यात येणार आहे .सोबतच आकर्षक बक्षिसांची लय लुट खेळाडूंवर करण्यात येणार आहे.-

समस्त नागरिकांना राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवाच्या हार्दीक शुभेच्छा
जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती
'जिजाऊ' प्लॉट नं.३३ व ३४, वालकट कंम्पाउंड, अमरावती फोन: २५६००५७ फॅक्स (०७२१)२५६६१५६
शुभेच्छूक: सर्व संचालक मंडळ जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती
ठेवीचे दर
8.50% १२ महिन्यांकरिता
9.00% ज्येष्ठ नागरिकांकरिता

# श्रीराम ध्वज व अन्य साहित्यांची धडाक्यात विक्री; होणार २०० कोटींचा व्यवसाय

## झेंडे, दुपट्टे, तोरण लायटिंग, बिल्ले, बॅच, टी-शर्ट, टोपी व अन्य साहित्यांना प्रचंड मागणी

दि. १२ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर : अयोध्येत २२ जानेवारीला श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होणार आहे. या शुभप्रसंगी संपूर्ण देशात वातावरण राममय झाले आहे. नागपुरात श्रीरामाची प्रतिमा असलेले झेंडे, दुपट्टे, तोरण, लायटिंग, बिल्ले, टोपी, टी-शर्ट आदींसह अन्य साहित्यांची धडाक्यात विक्री होत आहे. इतवारी येथील १०० हून अधिक दुकानदार विक्री करीत आहे. नागपुरात हा व्यवसाय २०० कोटींहून अधिक होणार असल्याचा व्यापाऱ्यांचा अंदाज आहे. प्रचंड मागणीमुळे होऊ लागला साहित्यांचा तुटवडा

> कन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (कॅट) संपूर्ण देशात श्रीरामाचे ध्वज आणि अन्य साहित्यांचे नि:शुल्क वाटप करीत आहे. या निमित्ताने देशात ५० हजार कोटींचा व्यवसाय होणार आहे. नागपुरात १ लाखाचे साहित्य रॅलीद्वारे जनजागृती करून वाटप करीत आहे. व्यापाऱ्यांशी संवाद साधण्यात येत आहे. २२ जानेवारी हा दिवस दरवर्षी श्रीरामाचा जन्मदिन म्हणून साजरा होणार आहे.
> **बी.सी. भरतीया, राष्ट्रीय अध्यक्ष, 'कॅट'**

धार्मिक साहित्यांचे वितरक व विक्रेते लिलारिया ॲण्ड सन्सचे गिरीश लिलारिया म्हणाले, गेल्यावर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'घर घर तिरंगा' अशा आवाहनानंतर संपूर्ण देशात तिरंगा झेंड्याची मोठ्या प्रमाणात विक्री झाली होती. यंदा श्रीरामाच्या प्राणप्रतिष्ठेच्या निमित्ताने श्रीरामाच्या छायाचित्रांच्या साहित्यांची दुपटीने विक्री होत आहे. मागणीमुळे किरकोळ दुकानदारांनी ऑर्डर बुक केले आहेत. भिवंडी येथून कपडा येतो तर अहमदाबादला प्रिंटिंग होते. कटिंग आणि सिलाई नागपुरात होत आहे. त्यानंतर हे धार्मिक साहित्य संपूर्ण महाराष्ट्र आणि लगतच्या राज्यांमध्ये पाठविण्यात येत आहे. दरदिवशी ऑर्डर वाढत असून पुरवठा करणे अशक्य झाले आहे.



**श्रीराम ध्वज आणि दुपट्ट्याला सर्वाधिक मागणी**

घरोघरी श्रीरामाचे ध्वज लावण्याचे आवाहन करण्यात येत आहे. नागरिकांनी या आवाहनाला प्रतिसाद दिला आहे. त्यानुसार बहुतांश नागरिक घरावर श्रीराम ध्वज लावत आहेत. शिवाय तोरण आणि पताकाची विक्रीला प्रतिसाद मिळत आहे. याशिवाय २२ जानेवारीला श्रीरामाचे चित्र असलेले गळ्यातील दुपट्टे आणि वाहनांवर लावण्यासाठी झेंड्याची खरेदी करीत आहे. अनेकांनी श्रीरामाची प्रतिमा असलेले टी-शर्ट खरेदी केले आहेत.

**प्राणप्रतिष्ठेचा मकर संक्राती च्या व्यवसायावर परिणाम** - नागपुरातून संपूर्ण महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगाना या राज्यांमध्ये साहित्यांचा पुरवठा करण्यात येत आहे. मागणी वाढल्याने तुटवडा जाणवत आहे. निर्मितीही वेगात सुरू असल्याचे इतवारीतील वितरक आणि विक्रेत्यांनी सांगितले. धार्मिक साहित्यांच्या विक्रीचा मकरसंक्रातीच्या व्यवसायावर परिणाम झाल्याचे त्यांनी सांगितले. यंदा मकरसंक्रातीच्या व्यवसायात ३० ते ४० टक्के घसरण झाल्याचे दिसून येत आहे. भेटस्वरुपात देण्यात येणाऱ्या भांड्यांच्या विक्रीवर परिणाम झाला आहे.

> गेल्यावर्षी तिरंगा झेंडा तर यंदा श्रीराम ध्वज व संबंधित साहित्यांची सर्वाधिक विक्री होत आहे. मागणीमुळे बाजारपेठेत तुटवडा जाणवत आहे. कपडा आणि प्रिंट बाहेरून झाल्यानंतर नागपुरात कटिंग आणि सिलाई होत आहे. येथून नागपूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगाना राज्यात पुरवठा होत आहे. नागपुरात १०० हून अधिक विक्रेते विक्री करीत आहेत.
> **गिरीश लिलारिया, साहित्यांचे वितरक व विक्रेते.**

| साहित्य विक्री | दर (रुपये) |
| --- | --- |
| राम, हनुमान दुपट्टे | ९ ते १५० |
| तोरण पताका | २५ रु. पॅकेट |
| लायटिंग | ४५ ते १५० रू. पॅकेट |
| बॅच व बिल्ले | ५ ते २० नग |
| टोपी | ५ ते २० नग |
| टी-शर्ट | ८० ते १५० नग |
| वाहनाचे झेंडे | १५ नग |

# कोणालाही अपात्र न केल्याने कोर्ट गंभीर दखल घेईल - अनिल परब

दि.११विदर्भ प्रजासत्ताक मुंबई पासपोर्ट

महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष प्रकरण सुप्रीम कोर्टाने दिलेली चौकट मोडून विधानसभा अध्यक्षांनी आमदार अपात्रता प्रकरणात निकाल दिला असल्याचे शिवसेना ठाकरे गटाचे नेते ॲड. अनिल परब यांनी म्हटले. सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे उल्लंघन झाल्याने कोर्टही गंभीर दखल घेईल असा विश्वास परब यांनी व्यक्त केला. विधानसभा अध्यक्षांनी दिलेल्या निकालाची प्रत मिळाल्यानंतर वकिलांसोबत चर्चा करून सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



विधानसभा अध्यक्षांनी आमदार अपात्रतेचा निकाल देताना एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील गटाला शिवसेना पक्ष असल्याचा निकाल दिला. तर, भरत गोगावले यांची प्रतोदपदी निवड वैध ठरवली. तर, कोणतेही आमदार अपात्र ठरवले नाहीत. शिवसेना आमदार अपात्रतेच्या निकालानंतर राजकीय वर्तुळात या निकालाचे पडसाद उमटत असून चर्चा सुरू आहेत.

# तलाठी भरती प्रक्रिया रद्द करा शेकडो विद्यार्थ्यांची नांदगाव तहसील कार्यालयात धडक



## तलाठी भरती परीक्षा घोटाळा प्रकरणाचा मास्टर माईंड शोधा - प्रकाश मारोटकर

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव खंडेश्वर** - तलाठी भरती प्रक्रिया पुन्हा एकदा वादाच्या भवऱ्यात सापडली असून तलाठी भरती पेपरफुटी प्रकरणी शिवसेना ठाकरे गट आक्रमक झाला असून शेकडो विद्यार्थ्यांनि तहसील कार्यालयात धडक देऊन संपूर्ण तलाठी भरती प्रक्रिया रद्द करून नव्याने एम पी एस सी मार्फत तीन महिन्यांत पारदर्शक भरती प्रक्रिया राबवावी अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांनि केली तलाठी भरती प्रक्रिया हि पहिल्या दिवसा पासूनच संशयाच्या भवऱ्यात होती या तलाठी भरती पेपर फुटी प्रकरणांत गुन्हे सुद्धा दाखल आहेत आणि आता तलाठी भरती परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर गुणांमध्ये विसंगती आहे सरकार हि परीक्षा आणि सगळी प्रक्रिया पारदर्शक झाली असल्याचा दावा करीत आहे आणि गुणांकनात विसंगती असल्याचे उघड असतांना सरकार मात्र विद्यार्थ्यांनाचं पुरावे मागत आहे सदर भरती प्रक्रियेची सखोल चौकशी करून या भरती प्रक्रिया रद्द करून या भरती प्रक्रियेतील मास्टर माईंड शोधून त्याचेवर कठोर कारवाई करावी व तात्काळ एम पी एस सी मार्फत नव्याने तलाठी भरती प्रक्रिया राबवावी अशी मागणी विद्यार्थ्यांनि सरकार विरोधात तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढून केली आहे यावेळी शिंदे फडणवीस सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करत भरती प्रक्रियेत घोळ करून सरकार विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळ खेळत असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनि करून पारदर्शक शब्दाला लाजवतील असा कारभार सध्या सरकारचा सुरू आहे यावेळी शेकडो विद्यार्थी या मोर्चात सहभागी झाले होते सर्वच विभागाच्या भरती प्रक्रिया एम पी एस सी मार्फत राबवावी व अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली पोलीस भरती लवकरात लवकर घेण्यात यावी अश्या विविध मागण्याचे निवेदन तहसीलदार यांना सादर करण्यात आले यावेळी शिवसेनेचे प्रकाश मारोटकर अक्षय राणे चेतन धवने मनोज ढोके अक्षय हिवराळे शुभम रावेकर पवन शिरभाते महात्मा जोतिबा फुले अभ्यासिकेचे शुभम मोकडेकर स्वप्नील सुरोशे ऋषिकेश मारोटकर स्वराज्य अभ्यासिकेचे राहुल हजारे प्रतीक कोल्हे ज्ञानगंगा अभ्यासिकेचे रामेश्वर हजारे पवन गोंडाने डॉ पंजाबराव देशमुख अभ्यासिकेचे सागर वेरुळकर गौरव शेबे उषा तरोने मृणालि चिंचुलकर प्रतीक्षा इंगोले इत्यादी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारे विद्यार्थी उपस्थित होते.

# नागपूरचे शेफ विष्णू मनोहरांची श्रीराम चरणी पाकसेवा

## अयोध्येत तयार होणार तब्बल ७ हजार किलोचा विश्वविक्रमी शिरा

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक नागपूर** - प्रभू श्रीरामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा येत्या २२ जानेवारीला होणार आहे. या नेत्रदीपक आणि ऐतिहासिक सोहळ्याकडे साऱ्या जगाचे लक्ष लागले आहे. या राम मंदिर लोकार्पण सोहळ्याच्या निमित्ताने प्रत्येक रामभक्त आपली सेवा प्रभू रामाच्या चरणी करत आहे. यामध्ये देशाच्या हृदयस्थानी असलेले आणि खवय्येगिरीत अग्रनी असलेले नागपूर कसे मागे राहील? महाराष्ट्राचे प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर हे अयोध्येत प्रभू श्री रामचरणी एक आगळावेगळा विक्रम अर्पण करणार आहे. प्रभूश्रीराम जन्मभूमी अयोध्येतील भव्य मंदिरात मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाल्याच्या काही दिवसानंतर विष्णू मनोहर अयोध्येत तब्बल ७ हजार किलो शिरा (हलवा) तयार करणार आहे. प्रभू श्रीरामांना भोग लावल्यानंतर हा खास शिरा अयोध्येत येणाऱ्या दीड लाख राम भक्तांना प्रसाद म्हणून दिला जाणार आहे.

विश्वविक्रम प्रभू श्रीरामाचा चरणी अर्पण

प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी आजवर आपल्या नावे अनेक विश्व विक्रम नोंदविले आहे.



> **विशेष कढईत तयार होणार शिरा**
> श्रीराम जन्मभूमी मंदिर ट्रस्टच्या वतीने हा विश्वविक्रमी हलवा एकाच कढईत तयार होणार आहे. सुखामेवा शिजवण्यासाठी नागपुरात खास कढई तयार करण्यात आली आहे. ज्याचे वजन सुमारे १,३००-१,४०० किलो आहे. कढईचा व्यास १५ फूट आहे आणि तिची खोली ५ फूट आहे. कढई स्टीलची असून मध्यवर्ती भाग लोखंडाचा बनलेला आहे. जेणेकरून शिरा शिजवताना जळणार नाही. २२ जानेवारीला मुख्य सोहळा असल्याने सर्वसामान्यांना अयोध्येत प्रतिबंध आहे. यामुळे २४ ते २६ जानेवारीदरम्यान हे आयोजन करण्यात आल्याचे विष्णू मनोहर यांनी दिली.

यंदाच्या वेळी विशेष बाब म्हणजे या शिऱ्यासाठी प्रचंड आकाराची खास सर्जिकल स्टीलची कढई सध्या नागपुरात तयार केली जात आहे. शेकडो किलो वजनाची ही कढई लवकरच अयोध्येच्या दिशेने रवाना केली जाईल. त्यापूर्वी नागपूर जिल्ह्यातील विविध मंदिरात या कढईचे विशेष पूजनही केले जाणार आहे. यासाठी लागणारे पदार्थ देशातील वेगवेगळ्या ठिकाणातून अयोध्येत आणले जाणार आहे.

शिऱ्यासाठीचा खास रवा नागपुरातून जाणार आहे, तर खास तूप तिरुपतीवरून आणले जाणार आहे. शिऱ्यात टाकला जाणारा सुकामेवा काश्मीरमधून आणण्यात येईल. हा विक्रम माझा वैक्तिक नसेल, तर तो प्रभू श्रीरामाच्या चरणी अर्पण करण्याच्या भावनेतूनच हाती घेतला आहे., अशी भावना विष्णू मनोहर यांनी बोलतांना व्यक्त केली आहे.

> **कारसेवा ते पाकसेवा**
> राम हलवा तयार करण्यासाठी आम्हाला जवळजवळ तीन तासांचा कालावधी लागणार आहे. आम्ही सकाळी ६ वाजता हलवा तयार करण्याची प्रक्रिया सुरू करू. त्यानंतर, आम्ही त्यातील नैवेद्य म्हणून भगवान रामाला देऊ. मंदिर आणि शहरातील भक्तांमध्ये स्वयंसेवकांमार्फत हा प्रसाद वितरित करण्यात येणार असल्याचे विष्णू मनोहर यांनी सांगितले. मी यापूर्वी अयोध्येत कारसेवेसाठी गेलो होतो. आता पाकसेवेसाठी जाणार आहे. माझ्यासाठी ही फार भाग्याची गोष्ट असल्याचेदेखील त्यांनी यावेळी सांगितले.



> **इतके साहित्य लागणार**
> हा शिरा तयार करण्यासाठी ७०० किलो रवा, ७०० किलो तूप, ११२० किलो साखर, १७५० लिटर दूध, १७५० लिटर पानी, २१ किलो इलायची पावडर, २१ किलो जायफळ पावडर, १०० डझन केळ, ५० किलो तुलसी पत्ते, ३०० किलो काजू किसमिस बदाम आदी साहित्य लागणार आहे.

# राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्याचं अजित पवारांना निमंत्रण

## मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यासह अयोध्येला जाण्याची शक्यता



**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक मुंबई** - राम मंदिराच्या उद्घाटनाचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निमंत्रण देण्यात आले आहे. त्यामुळे २२ जानेवारीला अयोध्येत होणाऱ्या राम मंदिराच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार जाणार असल्याची माहिती देण्यात आलीये. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अजित पवार देखील अयोध्येत हजर राहणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते २२ जानेवारी रोजी अयोध्येत श्रीराम मंदिराचा लोकार्पण सोहळा पार पडणार आहे. त्यासाठी अनेक दिग्गज अयोध्येत उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली होती. त्यातच आता अजित पवार यांना देखील राम मंदिराच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी निमंत्रण देण्यात आलंय. राम मंदिराच्या उद्घाटनाकरता महाराष्ट्रातून सात पक्षप्रमुखांना निमंत्रण देण्यात आल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली. येथे मोठ्या संख्येने भाविक दाखल होणार असल्याने प्रशासन आणि मंदिर ट्रस्टकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

> **निमंत्रित करण्यात आलेल्या नेत्यांची यादी**
> मनसे अध्यक्ष राज ठाकरे , वंचितचे नेते प्रकाश आंबेडकरश्र, रिपाई खासदार रामदास आठवले , उपमुख्यमंत्री अजित पवार , राष्ट्रवादी अध्यक्ष शरद पवार , मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

**कोण जाणार प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला?**- राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी देशभरातून विविध कलाकार मंडळी आणि प्रतिष्ठित व्यक्तींनाही निमंत्रित करण्यात आलं आहे.आता कोण प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला जाणार याची उत्सुकता लागली आहे. शरद पवारांनी मी राम मंदिरात गर्दीत जाणार नाही, असे स्पष्ट केले आहे. आता अजित पवार काय भुमिका घेणार? ठाकरे बंधूपैकी कोण जाणार? याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्रातून एकूण ८८९ जणांना राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी निमंत्रित करण्यात आले असून त्यामध्ये ५३४ विशेष निमंत्रित आहेत. त्यामध्ये उद्योग, क्रीडा, कला तसेच आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार प्राप्त व्यक्तींचा समावेश आहे.तर महाराष्ट्रातील ३५५ साधू - संतांनाही अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी खास निमंत्रित करण्यात आलं आहे.

पाहिजेत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
अल्पावधीतच हजारो वाचकांच्या पसंतीस पडलेल्या सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक साठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुका,गाव तसेच वॉर्डनिहाय पत्रकारांची गरज आहे.लिखाणाची आवड तसेच उत्कृष्ट जनसंपर्क असणाऱ्या व्यक्तींनीच आमच्या मेल आय डी वर आजच संपर्क करा
संपर्क- prajasattaknews24gmail.com

# कापसाचे दर घटल्याने शेतकरी चिंतेत कापसाच्या शेतीवर खर्च अधिक

## कापसाला मिळतोय तोकडा दर शेतकरी तरणार तरी कसा?

**अरुण जोशी**

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

दुष्काळ, कर्जबाजारीपणा, शेतमालाला मिळणारा तोकडा दर, यामुळे शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती मजबूत करणे गरजेचे असताना निसर्गासह मायबाप सरकारने शेतकऱ्यांची कायम साथ सोडल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. नगदी पीक समजल्या जाणाऱ्या कापसाचे दर घटल्याने शेतकरी चिंतेत आहेत. कापसाच्या शेतीवर मोठ्या प्रमाणात खर्च करूनही खासगी बाजारपेठेत कापसाचा दर शेतकऱ्यांना परवडणारा नाही. त्यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत.

दरवर्षीप्रमाणे यंदाही शेतकरी अस्मानी आणि सुलतानी संकटात सापडले आहेत. दुष्काळ, कर्जबाजारीपणा, महागाई यामुळे शेतकरी अगदी मेटाकुटीस आला आहे.



शेतकऱ्यांचे दिवस आज वाईट असताना शेतकरी हिताचे निर्णय घेणे सरकारला आवश्यक आहे. शेतकऱ्यांवर कर्जाचा डोंगर दिवसेंदिवस वाढत चालला आहे. मात्र शेतकऱ्यांना यातून बाहेर काढणारी व्यवस्था प्रभावी नाही. कापसावर शेतकरी मोठ्या प्रमाणात खर्च करतात. मात्र कापसाला केवळ ६ हजार सातशे रुपये तोकडा दर दिला जातो.मात्र त्याही पलीकडे शेतकरी पिकांवर मोठ्या प्रमाणात खर्च करतात, शेतकऱ्यांनी केलेला खर्चही भरून निघत नाही.त्यामुळे शेतकरी आत्महत्येचा आकडा वाढत चालला आहे. दरवर्षी विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात भरविले जाते.यंदा हिवाळी अधिवेशन शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करेल, असे वाटत असतानाच शासनाने शेतकऱ्यांची घोर निराशा केली. शेतमालाचे दर वाढले नाहीत. त्यामुळे शेतकरी अडचणीत आले आहेत. याकडे आता गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

नगदी पीक म्हणून शेतकरी कापसाची मोठ्या प्रमाणात लागवड करतात. मात्र कापसाला दिला जाणारा दर तोकडा आहे. त्या तुलनेत कापसावर केला जाणारा खर्च अधिक असल्याने कापसाचा तोकडा दर शेतकऱ्यांना परवडणारा नाही. त्यामुळे शासनाने कापसाची दरवाढ करावी.

**प्रकाश साबळे**
**प्रगतीशील शेतकरी**

### कापसाचा दर वाढवा

देशातील शेतकऱ्यांची अवस्था आज बिकट आहे. घामाच्या दामासाठी शेतकऱ्यांचा संघर्ष सुरू झाला आहे. दुष्काळ, कर्जबाजारी, महागाई याने शेतकरी पार होरपळून गेला आहे. शेतमालाला पाहिजे त्या प्रमाणात भाव नाही. शासकीय यंत्रणेनेही ठामपणे शेतमालाला योग्य दर देऊन शेतकऱ्यांच्या रक - पाठीशी उभे राहणे आवश्यक आहे. ९. त्यामुळे शासनाने कापसाचे दर वाढवावा, ट अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# सुनिल केदारांची अडचण वाढणार; गुन्ह्याच्या कलमात वाढ

## विनापरवानगी रॅलीतील दहाहून अधिक वाहने जप्त; इतर वाहनचालकांचा शोध सुरू

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

जामीन मिळाल्यानंतर कारागृहातून बाहेर आल्यावर पोलिसांच्या परवानगीशिवाय रॅली काढणे काँग्रेसचे आमदार व माजी मंत्री सुनील केदार यांना महागात पडणार असल्याची चिन्हे आहेत. पोलिसांनी या प्रकरणात केदार व इतर आरोपींविरोधात आणखी एक गुन्ह्याचे कलम वाढविले आहे. त्याचप्रमाणे रॅलीत सहभागी झालेली दहाहून अधिक चारचाकी वाहने जप्त केली असून, इतर वाहनचालकांचा शोध सुरू आहे. आता पोलिसांकडून या प्रकाराचा अहवाल न्यायालयात सादर करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये १५० कोटींपेक्षा जास्त रकमेचा सरकारी रोखे खरेदी घोटाळा करणारे केदार यांना विविध कडक अटींसह हायकोर्टाने मंगळवारी जामीन मंजूर केला होता. बुधवारी दुपारी कारागृहातून बाहेर पडल्यावर केदार यांनी समर्थकांसह शहरात शक्तिप्रदर्शन केले. या रॅलीत मोठ्या प्रमाणावर मोठ्या कार होत्या व त्यामुळे वाहतूक कोंडीदेखील निर्माण झाली होती. पोलिसांनी अगोदरच केदार समर्थकांना गर्दी करू नये,



अशी सूचना देण्यात आली होती. तरीदेखील रॅली काढण्यात आली. पोलिसांनी याची गंभीरतेने दखल घेत केदार यांच्यासह जि. प.चे माजी उपाध्यक्ष मनोहर कुंभारे, रवींद्र चिखले, जि. प. उपाध्यक्ष कुंदा राऊत, जि. प. सभापती अवंतिका लेकुरवाळे, अनिल राय, संजय मेश्राम आणि विष्णू कोकड्डे यांच्यावरही गुन्हा दाखल केला होता.

सुरुवातीला यात भादंविच्या कलम ३४१, १४३, १८८, मुंबई पोलिस कायदा कलम १३५, मोटार वाहन कायदा कलम १८४, १९४ आणि १७७ या कलमांचा समावेश होता. मात्र, त्यात कलम '१५३-अ'चा देखील समावेश करण्यात आला. धर्म, जात, जन्मस्थान, निवासस्थान, भाषा आदींच्या आधारावर विविध गटांमध्ये शत्रुत्व वाढवणे आणि सामाजिक सलोखा बिघडवणे अशा प्रकरणात हे कलम लावण्यात येते. संबंधित कलमांतर्गातील गुन्हा अजामीनपात्र आहे. त्याची धंतोली पोलिस ठाण्याच्या स्टेशन डायरीत नोंदी करण्यात आली आहे. त्यामुळे आता केदार यांना पोलिस परत ताब्यात घेणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### तपास करून न्यायालयाला कळविणार

परवानगी नाकारली असतानादेखील रॅली काढणे, कारागृहाच्या संवेदनशील भागात घोषणाबाजी करणे, वाहतुकीची कोंडी निर्माण करणे तसेच सामाजिक सलोखा बिघडविण्याचा आरोप केदार व त्यांच्या समर्थकांवर लागले आहेत. आता पोलिसांकडून यासंदर्भात कुठली पावले उचलण्यात येतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. या प्रकरणाची पोलिसांकडून सखोल चौकशी सुरू आहे. चौकशी झाल्यावर याचा विस्तृत अहवाल न्यायालयाकडे सादर करण्यात येईल, अशी माहिती अपर पोलिस आयुक्त प्रमोद शेवाळे यांनी दिली.

# एसटी सुरक्षित प्रवासाची हमी देतो रस्ता सुरक्षा सप्ताह प्रारंभ - ठाणेदार सुरज बोंडे



**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक चांदूरबाजार**

एसटी सुरक्षित प्रवासाची हमी देते हे आजही जनसामान्यांमध्ये विश्वास आहे. तो विश्वास कायम ठेवण्याची जबाबदारी ही एसटी कर्मचाऱ्यांची आहे असे प्रतिपादन चांदूरबाजार आगारामध्ये रस्ता सुरक्षा सप्ताह च्या प्रारंभ कार्यक्रमांमध्ये ठाणेदार सुरज बोंडे यांनी केले.

यावेळी मंचकावर योगेश सोनवणे विभागीय लेखाधिकारी अमरावती, वाहतूक पर्यवेक्षक अमरावतीचेश्री.ठाकरे , ठाणेदार सुरज बोंडे, आयटीआयचे गोपाल गावंडे, श्री. अकोलकर, आगार व्यवस्थापक गोपाल चोरमले, सहा. वाहतूक अधीक्षक रावसाहेब मकेश्वर,गौतम बनसोड,पत्रकार मदन भाटे व शरद केदार उपस्थित होते.पुढे बोलताना ठाणेदार बोंडे म्हणाले की, धावपळीच्या जीवनात, प्रत्येकाच्या जीवनात समस्या येतात त्या समस्येचा ताण वाहन चालविताना तो तान विसरून जाव कारण आपल्यावर गाडीत असणाऱ्या प्रत्येक प्रवाशाची जबाबदारी ही चालकावर असते. असे ते म्हणाले. तसेच यावेळी श्री ठाकरे, गोपाल गावंडे, श्री अकोलकर, व आगार व्यवस्थापक गोपाल चोरमरे यांनीही यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले.कार्यक्रमाचे संचालक व आभार प्रदर्शनअपेक्षा मोहोड यांनी केले. या कार्यक्रमाला चालक, वाहक व यांत्रिक विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

# आई-वडील नसलेल्या मुलामुलींना दरवर्षी मिळणार १० हजार रुपये

## अमरावती मनपाची बालकल्याण योजना, १८ वर्षाआतील बालकांना लाभ

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

शहरातील १८ वर्षाआतील ज्या बालकांचे आई व वडील असे दोन्ही पालक नाहीत. अश्या अनाथ मुला-मुलींच्या संगोपनासाठी महानगर पालिकेतर्फे दरवर्षी १० हजार रुपये आर्थीक सहाय्य दिल्या जाणार आहे. गुरुवारीमहापालिकेचे प्रशासक पवार यांनी मनपाने सुरू केलेल्या बालकल्याण योजनेची घोषणा केली. त्यानुसार शहरातील आई-वडील नसलेल्या (अनाथ) मुला-मुलींचा सांभाळ व पालनपोषण करण्याकरीता ते बालक १८ वर्षाचे होईपर्यंतदरवर्षी १० हजार रुपये आर्थीक सहाय्य मनपातर्फे दिल्या जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अनाथ बालकांचा सांभाळ करणाऱ्या पालकांकडून ३१ जानेवारी २०२४ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहे.

**अटी-शर्ती व पात्रता**

महानगरपालिकेच्या बालकल्याण योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांना विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करावा लागेल. अनाथ बालक आणि त्यांचे पालक अमरावती शहरातील रहिवासी असावे. पालकाचे अमरावती शहरातील



मतदान ओळखपत्र, राशन कार्ड असणे आवश्यक, अनाथ बालकाचे वय दिनांक ०१.१०.२०२३ रोजी १८ वर्षाचे आतील असल्याचा पुरावा. (बालकाचा जन्म दाखला किंवा शाळेचे बोनाफाईड सर्टिफिकेट) अनाथ बालकाचे आधार कार्ड, बालकाचे आई व वडील यांचे मृत्यू प्रमाणपत्र, बालकाचे किंवा त्यांचे पालकाचे बँक खात्याची प्रत, अनाथ बालकाचे आई व वडील हयात नसल्याने अर्जदार पालकांनी बालकाचा सांभाळ करण्याबाबतचे १०० रुपयांचे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र, प्रतिज्ञापत्र, बालकाचे पालन पोषण करण्यास शारीरीकदृष्ट्या सक्षम असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र.

**येथे करा संपर्क**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जाचा व अटी, शर्तीचा नमुना व अधिक माहितीकरिता महानगर पालिकेच्या महिला व बाल विकास विभाग कार्यालय, राजकमल चौक, येथे कार्यालयीन वेळेत सपर्क साधावा. डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू डॉट अमरावती कॉर्पोरेशन डॉट इन या संकेतस्थळावर सुद्धा अर्ज उपलब्ध असेल. शहरातील सर्व खऱ्या गरजुपर्यंत या योजनेची माहिती व लाभ पोहोचविण्याचे जाहीर आवाहनही मनपातर्फे करण्यात आले आहे.

### अमरावतीत तलाठी पदभरती विरोधात विद्यार्थी आक्रमक

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

तलाठी पदभरती पुन्हा घ्यावी तसेच टीसीएस आयबीपीएस या परीक्षा घेणाऱ्या कंपन्या बंद कराव्या या मागणीसाठी आज युवक दिनी युवक रस्त्यावर उतरले होते, यावेळी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर स्पर्धा परीक्षाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी डॉ.अजय यावले यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढला होता यावेळी तलाठी पदभरती रद्द करून नव्याने घ्या व पोलीस भरती तात्काळ काढा अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली यावेळी मागण्याचे फलक विद्यार्थ्यांनी आक्रोश केला यावेळी काँग्रेस नेत्या व आमदार यशोमती ठाकुर यांनी मोर्चाला पाठींबा देत त्यांनी विद्यार्थ्यांची भेट घेतली तर युवक दिनी विद्यार्थी रस्त्यावर उतरले तर व पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांना तर संविधानही खोटं वाटतं अशी टीका यशोमती ठाकूर यांनी केली.

# १ फेब्रुवारी रोजी देशाचा अर्थसंकल्प संसदेत सादर

## निर्मला सीतारामन करणार देशाचं बजेट सादर



**दि.११विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन या १ फेब्रुवारी रोजी देशाचा अर्थसंकल्प संसदेत सादर करतील. ३१ जानेवारी रोजी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात होणार असून ९ जानेवारीपर्यंत हे अधिवेशन सुरु राहणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात होईल.

आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संसदेचं हे अर्थसंकल्पीय अधिवेशन अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. त्यामुळे या बजेटमध्ये काही महत्त्वपूर्ण घोषणा होण्याची देखील शक्यता आहे. नुकतेच संसदेच्या हिवाळी अधिवेशनात गदारोळ झाला. संसदेच्या सुरक्षेबाबत केंद्रीय गृहमंत्र्यांनी सभागृहात विधान करावे, अशी मागणी काँग्रेससह विरोधी पक्ष करत होते. सभागृहाचा अवमान केल्याप्रकरणी १०० हून अधिक विरोधी खासदारांना निलंबित करण्यात आले.सभागृहाचा अवमान केल्याप्रकरणी १४ डिसेंबर रोजी विरोधी बाकांवरील १३ खासदार, १८ डिसेंबर रोदी ३३ खासदार, १९ डिसेंबरला ४९ आणि २० डिसेंबरला दोन खासदारांना निलंबित करण्यात आले. त्याचवेळी १४ डिसेंबरला राज्यसभेतून ४५ आणि १८ डिसेंबरला ४५ खासदारांना निलंबित करण्यात आलं होतं. लोकसभेत सभापतींचा अवमान केल्याप्रकरणी ४९ विरोधी सदस्यांना मंगळवारी निलंबित करण्यात आले होते. याआधी सध्या सुरू असलेल्या अधिवेशनात लोकसभेच्या ३३ आणि राज्यसभेच्या ४५ खासदारांना निलंबित करण्यात आले होते. निलंबित करण्यात आलेल्या खासदारांमध्ये दानिश अली, प्रतिभा सिंह, दिनेशचंद्र यादव, शशी थरूर, सुप्रिया सुळे, डिंपल यादव आदींची नावे आहेत. त्याचवेळी निलंबित खासदारांनी सभागृहाच्या प्रवेशद्वाराजवळ ठिय्या आंदोलन केले.

आता यामधील किती खासदार अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी सभागृहात उपस्थित राहणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. तसेच या अर्थसंकल्पीय अधिवेशनात कोणत्या महत्त्वाच्या घोषणा केल्या जाणार याकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागून राहिलं आहे. त्यामुळे हे अर्थसंकल्पीय अधिवेशन देशाच्या दृष्टीने आणि आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचं मानलं जातंय.

# आजपासून विवेकानंद ग्रंथालयात व्याख्यानमाला

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

श्रीरामकृष्ण विवेकानंद समिती अंतर्गत राष्ट्रीय युवकदिनाचे औचित्य साधून विवेकानंद समिती येथील सभागृहात शुक्रवारपासून (ता.१३) तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येत आहे. शुक्रवारी सकाळी ८.३० वाजता स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमेची शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

शुक्रवारी सायंकाळी सात वाजता स्वामी विवेकानंदांचे विचार आणि आजची सामाजिक परिस्थिती या विषयावर प्राचार्य डा. पी.आर. राजपूत यांचे व्याख्यान होईल, प्राचार्य डॉ. अमरसिंग राठोड कार्यक्रमाचे अध्यक्ष राहतील. शनिवारी (ता.१३) सायंकाळी मातृधर्मी महाकवी साने गुरुजी यांच्या जीवनचरित्रावर ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सतीश तराळ प्रकाश टाकतील. प्रा. कल्पना देशमुख अध्यक्षस्थानी राहतील. तर रविवारी (ता. १४) स्वामी विवेकानंद आणि युवा वर्ग या विषयावर रामकृष्ण मठ नागपूरचे स्वामी ज्ञानगम्यानंद महाराज यांचे व्याख्यान होणार असून प्रमुख पाहुणे सहायक ग्रंथालय संचालक डॉ. राजेश पाटील व जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. सूरज मडावी उपस्थित राहतील. कार्यक्रमानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते चित्रकला व निबंध स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कार दिले जातील.

# विकसित भारत संकल्प यात्रेचे मेहरीआम गावात आदिवासी लोकनृत्य करून जल्लोषात स्वागत

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक चिखलदरा**

भारत सरकारद्वारे विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन १५ नोव्हेंबर २०२३ भगवान बिरसा मुंडा जयंती निमित्ताने संपूर्ण भारतात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेल्या विकसित भारत,संकल्प यात्रा सुरु करण्यात आली आहे.या यात्रेचा माध्यमातून लोकांना पंचायत समिती,शिक्षण विभाग,महसूल विभाग,वन विभाग,आरोग्य विभाग,कृषी विभाग,पशुसंवर्धन विभाग,एकात्मिक बालविकास विभाग,बांधकाम विभाग या प्रत्येक विभागातून लोकांना मिळणार्या योजनेबद्धल माहिती दिली जात आहे.योजना घेतांना येणार्या अडचणी कश्या दूर कराव्यात?या बद्धल सुद्धा उपस्थित कर्मचार्यांनी माहिती दिली.१० जानेवारी रोजी मेहरीआम गावात विकसित भारत संकल्प यात्रेचे रथ पोहचले या रथाचे स्वागत गावकरी लोकांनी आदीवाशी लोकनृत्य(गादली सुसून) करून मोठया हर्ष उल्हासाने केले.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे हातून रथ पूजन तसेच भगवान बिरसा मुंडा,महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रपिता महात्मा गांधी व जाणता राजा शिवाजी महाराज यांचे प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून कार्यक्रमाला सुरवात केली.कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी सुरेश धिकार सरपंच,व प्रमुख पाहुणे नितीन शिरभाते कार्यक्रम अधिकारी नरेगा पंचायत समिती चिखलदरा तसेच राजू अखंडे उपसरपंच,डॉ.वानखडे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र काटकुंभ,डॉ.अजय ठोसर आरोग्य सामुदाय अधिकारी ,नरेंद्र कपले बांधकाम विभाग,डॉ.अंकित राठोड,परसराम कासदेकर,रामा धिकार,डॉ.अरविद वानखडे,बी.एम.सरदार,गजेंद्र चव्हाण सचिव,सखाराम धिकार रोजगार सेवक,प्रशांत पंडोले



पत्रकार व मान्यवर मंचावर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.अरविद वानखडे यांनी केले. उपस्थित सर्व विभागाचे अधिकारी यांनी गावातील लोकांना आप-आपल्या विभागातल्या योजने बद्धल माहिती दिली.व चांगल्या प्रकारे योजने बद्धल मार्गदर्शन केले. मेळघाटातील लोकांना योजना घेतांना खूप संकटांचा सामना करावा लागतो.लोकांनासाठी प्रत्येक विभागात शासनाने योजना सुरू केली आहे. परंतु लोकांना काही योजने बद्धल माहिती आहे. तरी काही योजने पासून आज पर्यंत मेळघाटातील लोकं वंचित आहेत.परंतु विकसित भारत संकल्प रथ यात्रेमुळे मेळघाटातील लोकांना योजने बद्धल माहिती मिळत आहे.नितीन शिरभाते नरेगा कार्यक्रम अधिकारी यांनी नरेगातुन वैयक्तिक व सार्वजनिक योजना घेण्यासाठी लोकांना आव्हान केले आहे.गुरांचा गोठा,बकरी शेट, विहीर,शेततळे,या सारख्या योजना घ्या. व स्वताचा सर्वांगीण विकास करा.शासनाने योजना तुमचासाठी व तुमचा विकासासाठी सुरु केल्या आहे.या सर्व योजनेच्या पुरेपूर फायदा घ्या.व योजनेच्या शंभर टक्के तुम्ही लाभ घ्यावा. योजना घेण्यासाठी काही अडचण येत असेल तर ग्रामपंचायत सचिव यांची मदत घ्या.पंतप्रधान यांनी विकसित भारत संकल्प यात्रा देशातील प्रत्येक गोरगरीब, शेतकरी,कष्टकरी वंचित, शोषित,पिडीत लोकांना न्याय मिळावा यासाठी सुरु केली आहे.यात्रेचा माध्यमातून लोकांनी योजनेबद्धल माहिती घ्यावी.आणि योजना सुद्धा लोकांनी प्रत्येक विभागातून घ्यावे.जेणेकरून भारत देशाचा लोकांचा विकास झपाट्याने होणार आणि २०४७ पर्यंत भारत देश हा विकसित देश होणार अशी संकल्पना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आहे. कार्यक्रमाचा सरते शेवटी शपथ घेऊन चित्रफीत दाखवण्यात आली.कार्यक्रमाचे संचालन धुर्वे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.अरविद वानखडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीसाठी सखाराम धिकार,शंकर धिकार,प्रकाश धुर्वे,रमेश धिकार,चतुर,दिलीप धिकार,रामकली धिकार यांनी मेहनत घेतली.हजारो नागरिकांचा उपस्थितीत विकसित भारत संकल्प यात्रेचा कार्यक्रम सुखरूप संपन्न झाला.

समस्त नागरिकांना राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवाच्या हार्दीक शुभेच्छा
जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती
'जिजाऊ' प्लॉट नं.३३ व ३४, वालकट कंम्पाउंड, अमरावती फोन: २५६००५७ फॅक्स (०७२१)२५६६१५६
शुभेच्छूक: सर्व संचालक मंडळ जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती
ठेवीचे दर
8.50% १२ महिन्यांकरिता
9.00% ज्येष्ठ नागरिकांकरिता

# अचलपुर लघुपाटबंधारे विभागाचा लिपीक ९ वर्षापासून एकाच टेबलवर

## त्या लिपीकाची चौकशी करुन अहवाल सादर करा : कार्यकारी संचालकांचे मुख्य व अधिक्षक अभियंत्यांना आदेश

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार**

अचलपूर येथील मध्यम व लघू पाटबंधारे विभाग अचलपूर कार्यालयातील कार्यरत प्रथम लिपिक या पदावर विनोद नागे गेल्या नऊ वर्षापासून एकाच कार्यालयात थाडमांडून कार्यरत आहे.अमरावती परिमंडळाचे दिनांक १२ सप्टेंबर २०१४ चे आदेशान्वये मध्यम व लघु पाटबंधारे उपविभाग अचलपूर येथून वाशिम पाटबंधारे मंडळ वाशिम जि.वाशिम अंतर्गत येणार्या लघु पाटबंधारे विभागकारंजा लाड येथे पदोन्नती असतांना ते मध्यम व लघु पाटबंधारे विभाग अचलपूर येथे कसे रुजू झालेत?महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार




कोणत्याही कर्मचाऱ्याला ५ वर्षाच्या वर एकाच ठिकाणी ठेवण्यात येऊ नये असे स्पष्ट निर्देश असतानाप्रथम लिपिक विनोद म.नागे दिनांक १ सप्टेंबर २०१५ पासून ४ डिसेंबर २०२३ पर्यंत ९ वर्षापासून एकाच ठिकाणी कसे कार्ययरत आहेत ? तसेच विनोद म. नागे यांची पदोन्नतीच लघु पाटबंधारे विभागात कारंजा लाड येथे असतांना केवळ स्वतःच्या फायदा करता सर्व शासकीय अटी व नियम धाब्यावर ठेवून अचलपूर येथील मध्यम व लघु पाटबंधारे विभागात कार्यरत आहेत. या बाबीकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पूर्णपणे दुर्लक्ष आहे.विनोद म. नागे यांनी भ्रष्टाचाराच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात अचलपूर येथे शेती व इतर संपत्ती प्राप्त केलेली आहे. तसेच कार्यालयातील कोणतेही काम लाच घेतल्याशिवाय नागे करीत नाही.असे आरोपाची तक्रार असतांना याबाबत कार्यकारी अभियंता पूर्णपणे अनभिज्ञ आहेत तरी विनोद म.नागे यांची सखोल चौकशी करून त्यांना मध्यम व लघु पाटबंधारे विभाग अचलपूर कार्यालयातून हटविण्यात यावे अशा आशयाचे निवेदन अ.भा. ग्रामीण पत्रकार संघाचे प्रसिद्धी प्रमुख सागर सवळे यांनी निवेदनाद्वारे कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांच्याकडे दिनांक ७ डिसेंबर २०२३ रोजी निवेदनाद्वारे केली होती.त्या निवेदनाची दखल कार्यकारी संचालकांनी घेतली असुन सदर प्रकरणा संदर्भात दि.१९ डिसें.२०२३ पत्र क्र.१५८ /का.आ.०१/धा.१८० मुख्य अभियंता जलसंपदा विभाग अमरावती ,अधिक्षक अभियंता उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ अमरावती,कार्यकारी अभियंता मध्यम व लघु पाटबंधारे विभाग अचलपूर यांना गोपनीय पत्र पाठविले असुन सदर प्रकरणात कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर व तक्रारदार यांना पाठवावा असे पत्र एन .आर.दळवी अधिक्षक अभियंता विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांचे सही निशी अधिक्षक अभियंता उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ अमरावती व त्याच्या प्रतिलिपी मुख्यअभियंता व कार्यकारी अभियंता यांना पाठविल्या आहेत. आता सदर प्रकरणात अधिक्षक अभियंता काय कारवाई करतात या कडे लक्ष लागले आहे.

# महानगरात चार हजार रामरक्षा स्त्रोतांचे वितरण

## ज्येष्ठ विधीतज्ज्ञ ॲड.प्रशांत देशपांडेंचा महासंकल्प



**दि.१२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

देशभरात रामलल्लाच्या आगमनामिमित्त हर्षोल्लास वातावरण आहे. अयोध्येत २२ जानेवारीलाप्रभू श्री रामचंद्रांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर जेष्ठ विधीतज्ज्ञ ड.प्रशांत देशपांडे यांनी महासंकल्प केला आहे. त्याचयापुढाकारातून महानगरातील सर्व धार्मिक स्थळांवर ४ हजार रामरक्षास्त्रोतांचे वितरण व स्त्रोत पठण कार्यक्रमाला उत्सहात प्रारंभ झाला आहे.

रामलल्लाच्या मुर्तीची अयोध्यात २२ जानेवारीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा होणार त्याच पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी, धार्मिकसलोख्याचे वातावरण निर्माण व्हावे ही बाब लक्षात घेता ज्येष्ठ विधीतज्ज्ञ ड.प्रशांत देशपांडे यांनी महानगरात ४ हजार रामरक्षा स्त्रोत, पोथी पुस्तकांचे वितरणसोबतच त्याचे पठण करण्याच्या महासंकल्पाचीप्रभावी अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यांच्या या ऐतिहासिक अशा स्त्रोत वितरणाच्याकार्यक्रमाला बुधवार येथील महादेव मंदिरातून सुरुवात करण्यात आली. देशपांडे, यांच्या द्वारे आरतीच्या वेळी उपस्थितनागरिक महिला-तरुण आदींना रामरक्षा स्त्रोतांचे भक्तिमय वातावरणात वितरण करण्यातआले. यावेळी ड.चंद्रशेखर डोरले, ड.राजेंद्र पांडे, विकास चौधरी,प्रवीण अंबुलकर, जयंत कद्रे, प्रवीण वैश्य, सुधीर बोपूलकर, माधव पांडे, मनीष जोशी,अँड.गणेश गंधे, विजय टोपे, संदीप नावंदर, श्रीनाथ पांडे, तुषार वरणगावकर, मल्हारपुंडलिक, श्रीपाद जोशी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. यासह हाच उपक्रमजनार्दन पेठेतील स्वामी समर्थ मंदिर, श्री नारायण गुरु महाराज मठ, श्रीलक्ष्मीनारायण मंदिर, श्री गजानन महाराज मंदिर कुंभारवाडा, श्री अंबादेवी संस्थानयासह विविध ठिकाणी राबविण्यात आला. आगामी काळात अर्थात रामलल्लाच्या मूर्तीप्राणप्रतिष्ठा दिनापर्यंत हा उपक्रम शहरातील सर्व धार्मिक स्थळे, मठ, मंदिर,सार्वजनिक मंडळे, व्यायामशाळा, दुर्गोत्सव व गणेशोत्सव मंडळे इत्यादी ठिकाणीराबविल्या जाणार असल्याची माहिती जेष्ठ विधीतज्ज्ञ ड.प्रशांत देशपांडे यांनी दिली आहे.

# बर्निंग ट्रकचा थरथरार लाखोचे नुकसान

## कारंजा अमरावती रोडवर टाकळी फाट्याजवळची घटना



**दि१२ विदर्भ प्रजासत्ताक कारंजा ( लाड)**

कल्याण मुंबई वरून अमरावती साठी निघालेला ट्रक क्रमांक चक०५ -च् २९२२ सोमनाथ सानप यांच्या मालकीचा असलेला अमरावती रोडवर कामगारगाव समोर असलेल्या टाकळी फाटा जवळ अचानक चालत्या ट्रक मध्ये शॉर्टसर्किटमुळे सकाळी चार वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. चालक अजय कुमार गौतम व क्लीनर याचा लक्षात येताच. त्याने ट्रकला थांबून. कारंजा नगरपरिषद अग्निशामक दल यांना तात्काळ माहिती दिली. नेहमी तत्पर असणारा कारंजा नगरपरिषद अग्निशामक दल. मुख्याधिकारी मोरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ घटनास्थळी दाखल झाले व अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळविले त्यामध्ये ट्रक पूर्णपणे जळून खाक झाला. ट्रकमध्ये बर्थडे केक व लोखंडी चेअर्स असा लाखो रुपयाचा माल जळून खाक झाला. पण कारंजा अग्निशामक दलाने अतक प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळविले.त्यावेळी नगरपरिषद अग्निशामक दलाचे अधिकारी बातमसाहेब,चालक रेवाळे ,संजय फायरमॅन ,आमद खान ,शुभम झोपाटे यांच्या प्रयत्नामुळे आगीवर नियंत्रण मिळविले. वाशिम विभागांमधून कारंजा अग्निशामक दल हे वेळेवर दाखल होण्यास सगळ्यात अग्रेसर असते. त्यावेळी धनंज पोलीस स्टेशनचे कर्मचारी पण वेळेवर मदतीसाठी धावले. पुढील कारवाई धनज पोलीस स्टेशन करीत आहे.

# जिजाऊ बँकेचा उद्योगाभिमुख संकल्प सर्वांना विकास प्रक्रियेत आणणारा : खासदार नवनीत राणायांचे प्रतिपादन

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्हबँकेतर्फे बहुजन समाजाला विकाससाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी उद्योगाभिमुखअसलेला संकल्प हा सर्वांना विकास प्रक्रियेत आणणारा आहे, असे प्रतिपादन खासदारनवनीत राणा यांनी येथे केले. जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेत राष्ट्रमातामासाहेब जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवारी आयोजित कार्यक्रमात संवाद साधतानात्या बोलत होत्या.

यावेळी जिल्हाउपनिबंधक सहकारी संस्था शंकर कुंभार,

## जिजाऊ बँकेत जिजाऊ जन्मोत्सव उत्साहात साजरा



बँकेचे संस्थापक अध्यक्ष अविनाश कोठाळे,संचालक अनिल बंड, प्रदीप चौधरी, बबन आवारे, स्वप्निल वावरे, नितीन डहाके, श्रीकांतटेकाळे, पल्लवी बारब्दे, सुरेखा लुंगारे, डॉ.गौरव विधळे, सुभाष जाधव, वासुदेव बुरंगे, रामेश्वर विधळे,विलास राऊत, दिलीप डेहनकर, श्री कोहळे, डॉ.पंजाबराव देशमुख को-ऑपरेटिव बँकेचेसंचालक सुगंत बंड, अभयकुमार बारब्दे, दिलीप बारब्दे, अविनाश पेठे, शिवराज टेकाळे,बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन वानखडे, हरीश नाशिरकर, विजय ढोबे, अर्चनाबारबुद्धे यांच्यासह बँकेतील अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभ मान्यवरांच्या हस्तेमुख्या शाखेतील राष्ट्रमाता मासाहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पणकरण्यात आला. बँकेच्या कर्मचाऱ्यांनी त्यानंतर जिजाऊ वंदनेने कार्यक्रमाचा शुभारंभकरण्यात आला. बँकेचे संस्थापक अध्यक्ष अविनाश कोठाळे यांनी मान्यवरांना बँकेच्याप्रगतीच्या आलेखाची माहिती दिली. त्यासह बँकेद्वारे करण्यात आलेल्या कामांचीचित्रमय प्रदर्शनी बँकेच्या मुख्य शाखेत आहेत. ती सुद्धा अविनाश कोठाळे यांनीमान्यवरांना दाखवली. दरम्यान संवाद साधताना खासदार नवनीत राणा म्हणाल्या की,केंद्र सरकारच्या योजनांची बँकेद्वारे प्रभावी अंमलबजावणी करावी. त्यासाठी आपणसर्वकष सहकार्य करणार असल्याचे अभिवचन त्यांनी दिले. बँकद्वारे घर तिथे उद्योग असासंकल्प केला आहे. तो अतिशय स्तुत्य उपक्रम आहे. शेतकरी-युवक महिला यासह विविधसमूहांना बँकतर्फे उद्योगासाठी पाठबळ दिले जाते. त्यातून उद्योगाभिमुख समाजनिर्मितहोत असल्याने ही बँकेच्या चांगल्या कामाची पावती असल्याचे खासदार नवनीत राणा यांनीनमूद केले.

# जिजाऊ बँकेतर्फे राष्ट्रमाता माँ जिजाऊंना आदरांजली

## आरटीओ पुतळ्याजवळ कार्यक्रम

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव बँकेचे संस्थापक अध्यक्ष इंजि. अविनाश कोठाळे यांच्यासह जिजाऊ बँकेतील संचालक मंडळ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी राष्ट्रमाता माँ साहेब जिजाऊ यांना जयंतीनिमित्त आदरांजली अर्पण केली. बँकेचे संस्थापक अध्यक्ष अविनाश कोठाळे यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय नजीक असलेल्या



राष्ट्रमाता मासाहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेला शुक्रवारी सकाळी पुष्पहार अर्पण केला. यावेळी संस्थापक उपाध्यक्ष राजेंद्र जाधव, संचालक प्रदीप चौधरी, नितीन डहाके, वासुदेव बुरंगे, पल्लवी बारब्दे, बँकेचे सीईओ नितीन वानखडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी हरीष नासिरकर, अर्चना बारबुद्धे, किरण दिवाण, चैताली वानखडे, वैशाली भटकर, अनुघा धर्माळे, भावना देशमुख, शैलजा यावलीकर, आरती पाथरे, मंजुषा वैद्य, नमिता ठाकरे, भारती नामसे, शितल ढोरे, मंजुषा मोरे, वैकुंठ साळुंखे, विजय ढोबे, मनीष देशमुख, दीपक मेटे, श्रीकांत दाळू, राजेश बंड, प्रवीण इंगोले, अमोल चित्रे, गौरव राऊत, विलास सबाणे, कुणाला राऊत, निर्णय फुलाडी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# तिवसा तहसील मधील आपले महापोर्टल ऑनलाईन सेवा बंद

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक तिवसा**

तिवसा तालुक्यातील विद्यार्थी,पालक,नागरिक,शेतकरी यांना विविध प्रकारच्या दाखल्याची आवश्यकता असते.परंतु तिवसा तहसील मधील महापोर्टल ऑनलाईन सेवा बंद राहत असल्यामुळे तर कधी अत्यंत धिम्या गतीने चालू राहते.कधी सरोवर डाऊन होत असल्यामुळे सेतूकेंद्र मार्फत पाठविण्यात येणारे कागदपत्रे मिळणारे दाखले मिळण्यासाठी आठ ते दहा दिवस लागतात.




# जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी क्रिडा व सांस्कृतिक महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

## श्री.हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या पटांगणात भरला खेळाडू अधिकारी व कर्मचाऱ्याचा महाकुंभ : शनिवारला पारितोषिक वितरण

**दि१२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी क्रिडा व सांस्कृतिक महोत्सव येथील श्री.हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या पटांगणात सुरू आहे.दरम्यान सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये भक्तीगीत, भावगीत, लोकगीत, सिनेगीत, करावके गीत,समुह गीत,एकल गीत, युगलगीत, अभिनय, हास्य जत्रा असे बहारदार कार्यक्रम सादर करण्यात येत आहे. यानिमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानीच सर्वांना मिळत आहे. या सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविशांत पंडा यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी,मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी चंद्रशेखर





खंडारे,प्रकल्प संचालक प्रिती देशमुख,उप मुख्य कार्यकारी अधिकारी बी.टी.बायस,श्रीराम कुलकर्णी,उपमुख्य लेखा तथा वित्त अधिकारी आश्रिवनी,श्रीमती मिनू, पशुसंवर्धन अधिकारी श्री सोळंके,बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड,उपशिक्षणाधिकारी श्रीमती खान,श्री.हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे डॉ.भालेराव,क्रिडा महोत्सवाचे सचिव डॉ.कैलास घोडके,क्रिडा संयोजक डॉ.नितिन उंडे,गटविकास अधिकारी प्रफुल्ल भोरकडे, तेजस्वी आवळे,जिवनलाल भिलावेकर, बाळासाहेब रायबोले, सुधीर अरबट,विनोद खेडकर, मोहन श्रृंगारे, उज्वला ढोले, वासुदेव कनाटे, माया वानखडे,प्रकाश नाडकर यांच्यासह सर्व खाते प्रमुख,गटविकास अधिकारी उपस्थित होते.

### उद्याला पारितोषिक वितरण

सांघिक व वैयक्तीक स्पर्धा मध्ये क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल,कबड्डी,खो-खो,टेनिक्काईट,बॅडमिटन,टेबल टेनिस, कॅरम, बुध्दीबळ, जलतरण, धावणे, भालाफेक, गोळाफेक, थाळीफेक, लांब उडी, उंच उडी या खेळ प्रकारातील यशवंत महीला व पुरूष खेळाडूंना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविशांत पंडा व आदी मान्यवरांच्या हस्ते शनिवारला (ता.१३) पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे.